क्षमा मागणं हा एक सद्विचार आहे तर क्षमा करणं हा सद्आचार. आमच्याकडून कळत-नकळत आपलं मन दुखावलं गेलं असेल तर आपणाकडे क्षमायाचना करत आहोत.

* क्षमाप्रार्थी *
डॉ.कुंदनमल लोढा — संदीप लोढा
जयदीप लोढा — गौरव लोढा

केवल अगरबत्ती एजन्सी अहमदनगर.



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, बुधवार दि. १६.०९.२०२६ | अंक नं. १४३ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020



रूबी हॉल क्लिनिक, पुणे येथील प्रथितयश व निष्णात छाती (फुफ्फुस) विकार व ॲलर्जी विकार तज्ञ
डॉ. स्नेहा तिरपुडे MD (Pulmonary Medicine), DNB (Pulmonary Medicine) Asthma Allergy Fellowship, King's College, London (UK)
- नियोजित अहिल्यानगर भेट -
गुरूवार 17 सप्टेंबर 2026 रोजी स.9 ते दु.2 पर्यंत
जर आपणांस खालील व्याधी असल्यास
• फुफ्फुसाचे सर्व आजार • झोपे संबंधीचे सर्व विकार
• ॲलर्जी विकार • दमा • न्युमोनिया • न थांबणारा खोकला
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या गुरूवारी अहिल्यानगर भेट
स्थळ : आनंदऋषिजी हॉस्पिटल, अहिल्यानगर
अधिक माहितीसाठी संपर्क : भरत : 8208783915



मन, वचन, कायेने
## क्षमा असावी !
मिच्छामि दुक्कडम् !

जैन धर्माच्या पर्युषण पर्वानिमित्त आम्ही सर्व सभासद, खातेदार, ठेवीदार, कर्जदार आणि सर्वांचे अंत:करणपूर्वक क्षमायाचना करीत आहोत..

गणेशोत्सवाच्या सर्वांना हार्दिक शुभकामना !

प्रशांत भंडारी (सस्थ्यवस्थापक) — शैलेश गांधी (व्हा.चेअरमन) — अभय पितळे (चेअरमन)

संचालक मंडळ
संतोष गांधी — मनोज गुंदेचा — समीर बोरा
चेतन भंडारी — विनित बोरा — ॲड. आनंद फिरोदिया
शरद गोयल — सुवर्णा डागा — तेजस्विनी बोगावत
श्रीकांत भागवत — अमित भांड — शांतीलाल गुगळे (तज्ञ संचालक)
सीए (डॉ.) परेश बोरा (तज्ञ संचालक)
व सर्व कर्मचारी वृंद

SSGJOP
सहकारमहर्षी श्री सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अहमदनगर.
अर्बन बँक रोड, गुगळे मेडिकल समोर, अहिल्यानगर. फोन : ०२४१ - २३५४२९५, २३२३३०५, शाखा - मार्केट यार्ड, अहिल्यानगर. फोन : ०२४१-२४५११९५

सोनेतारण कर्ज
५ मिनिटांत कर्ज - No Hidden Charges
प्रती १० ग्रॅमवर १ लाख* कमीत कमी व्याजदर
वेअरहाऊस माल तारण कर्ज - 9.50% व्याजदर
मुदत ठेव 13 महिने - 8.00% (ज्येष्ठ नागरिकांसाठी 8.50%)



क्षमापना — क्षमापना
## मिच्छामि दुक्कडम्
जाने अनजाने में हमारे शब्दों से या व्यवहार से आपके निर्मल मन को कभी आहत किया हो तो
हमें क्षमा करें

- क्षमाप्रार्थी -
कांतीलाल चंदुलालजी कोठारी
आनंद कोठारी । हर्ष कोठारी । प्रेम कोठारी
एवं समस्त कोठारी परिवार
जामखेड । अहिल्यानगर

चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02



"मनात राग नको,
नात्यांत दुरावा नको...
प्रत्येक नातं प्रेमाने जपूया,
आणि झालेल्या चुकांसाठी
मनापासून क्षमा मागूया."

LIVE WITH KINDNESS FORGIVE ALWAYS
PLACE BEGINS WITH FORGIVENESS

## मिच्छामी दुक्कडम्

Varsha
अटूट रिश्ता ज़िंदगी भर का
वर्षा उद्योग समूह
(समस्त लुणिया परिवार)
अहिल्यानगर



सर्व भाविक भक्तांसाठी अत्यंत आनंदाची बातमी आपल्या अहिल्यानगर शहरात प्रथमच संगीतमय
## श्री गणेश महापुराण कथा
भव्य आयोजन करण्यात आले आहे.
तरी सर्व भाविकांनी लाभ घ्यावा.
कथाकार
डॉ.श्री.इंद्रदेवेश्वरानंद सरस्वतीजी महाराज
कार्यक्रमाची रुपरेषा
दि. १६/०९/२०२६ ते दि. २२/०९/२०२६
वेळ : दुपारी २:०० ते सायं. ५:००
महाप्रसादाचा लाभ घ्यावा
LIVE
शुभहस्ते
मा.श्री.संग्रामभैय्या जगताप
आमदार हिंदु हृदय सम्राट
आयोजक
समस्त पवार पाटील परिवार
7040743522
ठिकाण : बंधन लॉन्स, 'डी' मार्ट च्या पाठीमागे, नगर-मनमाड हायवे, सावेडी, अहिल्यानगर.



जीवन प्रवासात स्वार्थ, राग आणि अज्ञानामुळे झालेल्या चुकांसाठी, खऱ्या स्वच्छ मनाने, पर्युषण पर्वाच्या पवित्र समयी हृदयपूर्वक क्षमायाचना करीत आहोत. आम्हाला तुमच्या प्रेमाची आणि आपुलकीची आकांक्षा आहे.

जैनम् जयति शासनम्

## "क्षमा"
मिच्छामी दुक्कडम
* क्षमाप्रार्थी *
मयुर किशोर मुनोत
SPH
सिध्दांत प्लायवूड हार्डवेअर
न्यू टिळक रोड, अहिल्यानगर



SONI
Since 1965
TILES AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स ॲण्ड मार्बल इंडस्ट्रिज



## क्षमेने जग जिंकता येते.
कारण क्षमाशील व्यक्तीमध्ये सहनशीलता, धीरता, वीरता, गंभीरता, सहिष्णुता हे गुण सामावलेले असतात.

मिच्छामि दुक्कडम

- क्षमाप्रार्थी -
श्रीमती शांताबाई मदनलालजी छाजेड
मनोज छाजेड - डॉ. सौ. प्रिती छाजेड । मुकेश छाजेड - सौ. शर्मिला छाजेड

SIDDHI GROUP MANOJ CHHAJED VENTURE | SKYBRIDGE VAASTU-INSPIRED HOMES | Serrano Farms

Address : Sai Nagar,Burudgaon road, Ahmednagar 414001



Bharatgas
COOK FOOD, SERVE LOVE.
ANAND GAS AGENCY

## Michhami Dukkadam
"May our hearts be pure, our thoughts be kind, and our actions be filled with goodness. Michhami Dukkadam"

MEENA SURESH MUNOT | PRIYA VIVEK MUNOT
ANAND GAS AGENCY
ROAD, NEAR D-MART, SAVEDI, AHILYANAGAR 414003
anandgasagency2007@gmail.com
SUNIL STORE, MANIK CHOWK, AHILYANAGAR - 414001
9823508829

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com




शहरातून प्रवेश बंदी असताना सर्रासपणे शहर वाहतूक शाखा यांच्या नाकावरती टिच्चून अवजड वाहतूक राजरोससपणे सुरू आहे. याकडे मात्र वाहतूक प्रशासनाचे दुर्लक्ष होताना दिसत आहे (छाया – अमित मन्यार)

# नागरिकांच्या हरकतींपूर्वीच नगरसेवकांनी बदलला विकास आराखडा; उच्च न्यायालयाचा निर्णय डावलून ठराव; सत्ताधाऱ्यांचीच सुनावणी समिती

## ठराव विखंडित करून आयुक्त यशवंत डांगे यांची चौकशी करा : नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे मागणी

नगर – शहराच्या पुढील वीस वर्षांच्या विकासाची दिशा ठरविणाऱ्या सुधारित प्रारूप विकास योजनेत राजपत्रीय प्रसिद्धीपूर्वीच नगरसेवकांच्या सूचनांनुसार आरक्षणे, रस्ते आणि जमीनवापरात बदल करण्यात आल्याचा आरोप शाकीर शेख यांनी केला आहे. ३० जुलै २०२६चा विषय/ठराव क्र. २३ तात्काळ स्थगित करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४५१(१) व ४५१(३) अन्वये विखंडित करावा, तसेच आयुक्त यशवंत डांगे यांची विभागीय चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी नगर विकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे केली आहे.

अधिकृत अभिलेखांनुसार नगररचना अधिकारी तथा उपसंचालक नगररचना यांनी तयार केलेली मूळ प्रारूप विकास योजना, नकाशे व अहवाल कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध करण्यासाठी १८ मे २०२६ रोजी महानगरपालिकेकडे हस्तांतरित केले होते. मात्र, ती योजना प्रथम जनतेसमोर प्रसिद्ध न करता ३० जुलैच्या महासभेत ठराव क्र. २३द्वारे आरक्षणे वगळणे, त्यांचे प्रयोजन बदलणे, नवीन आरक्षणे समाविष्ट करणे, रस्ते वगळणे तसेच रस्त्यांची रुंदी, संरेखन आणि काही जमिनींचा प्रस्तावित वापर बदलण्याचे निर्णय घेण्यात आले. हे बदल नकाशे व अहवालात समाविष्ट करून नगररचना अधिकाऱ्याने ७ सप्टेंबर २०२६ रोजी ते प्रसिद्धीसाठी सादर केले. त्याच दिवशी आयुक्तांनी जाहीर सूचना क्र. अनगर/मनपा/नगररचना/८९१/२०२६ काढली आणि १० ते १६ सप्टेंबर २०२६च्या महाराष्ट्र शासन राजपत्रात कलम २६ (१) अंतर्गत सूचना प्रसिद्ध झाली. त्यामुळे मूळ आराखडा जनतेसमोर न ठेवता महासभेने बदललेलाच आराखडा प्रथम प्रसिद्ध केल्याचे स्पष्ट होत असल्याचा दावा शेख यांनी केला.

### कायद्यातील प्रक्रियाच उलटविली

MRTP अधिनियमाच्या कलम २६नुसार प्रारूप योजना प्रथम प्रसिद्ध करून नागरिकांकडून सूचना व हरकती मागविणे आवश्यक आहे. त्यानंतर कलम २८ अंतर्गत गठित नियोजन समितीने सुनावणी घेऊन अहवाल नियोजन प्राधिकरणाला सादर करायचा असतो. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच आवश्यक बदलांचा विचार करता येतो. मात्र, नागरिकांच्या हरकती, सुनावणी आणि समितीचा अहवाल येण्यापूर्वीच नगरसेवकांच्या सूचनांनुसार बदल निश्चित करून वैधानिक क्रम उलटविण्यात आल्याचे निवेदनात म्हटले आहे.

'गोविंद बाजीराव नवपुते विरुद्ध महाराष्ट्र राज्य व इतर' प्रकरणातील ५ ऑगस्ट २०१६च्या निर्णयात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने प्रारूप योजना प्रसिद्ध होण्यापूर्वी नगरसेवक, नागरिक, विकासक किंवा अन्य घटकांच्या सूचना व हरकतींचा महासभेला विचार करता येत नसल्याचे स्पष्ट केले आहे. या निर्णयाविरुद्धची अपिले सर्वोच्च न्यायालयाने १७ एप्रिल २०२० रोजी फेटाळली होती. हा बंधनकारक निर्णय अस्तित्वात असतानाही त्याच स्वरूपाची प्रक्रिया राबविण्यात आल्याचा आरोप शेख यांनी केला.

### बदल करणारे आणि हरकती ऐकणारेही सत्ताधारी

याच ठरावाद्वारे नागरिकांच्या हरकतींची सुनावणी करण्यासाठी तीन नगरसेवकांची नियोजन समितीवर नियुक्ती करण्यात आली. समितीवरील तिन्ही सदस्य सत्ताधारी पक्षाशी संबंधित असून, आराखड्यातील बदलांच्या सूचनाही प्रामुख्याने त्याच पक्षाच्या सदस्यांनी मांडल्याचे निवेदनात नमूद आहे. त्यामुळे सुनावणीच्या निष्पक्षतेवर आणि पारदर्शकतेवर गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. आयुक्तांनी या ठरावाची अंमलबजावणी रोखून विधी विभागाचा अभिप्राय घ्यायला तसेच शासनाकडे स्थगिती व विखंडनाचा प्रस्ताव पाठवायला हवा होता. त्याऐवजी बदललेले नकाशे व अहवाल प्रसिद्धीसाठी स्वीकारल्यामुळे अधिकारबाह्य ठरावाला प्रशासकीय मान्यता मिळाल्याचा आरोपही शेख यांनी केला.

नगररचना अधिकाऱ्याने १८ मे रोजी दिलेली मूळ योजना आणि महासभेच्या बदलांनंतर ७ सप्टेंबर रोजी सादर केलेली योजना स्वतंत्रपणे संकेतस्थळावर उपलब्ध नसल्यामुळे नागरिकांना नेमक्या बदलांची तुलना करता येत नाही. प्रसिद्ध केलेला विस्तृत अहवाल पूर्णतः इंग्रजीत असल्याने मराठी भाषिक नागरिकांच्या प्रभावी सहभागालाही बाधा निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

ठराव क्र. २३ स्थगित करून विखंडित करावा, मूळ व बदललेल्या योजनांची आरक्षणनिहाय तांत्रिक तुलना प्रसिद्ध करावी, प्रत्येक बदल कोणत्या नगरसेवकाने सुचविला व त्यावर नगररचना अधिकाऱ्याचा अभिप्राय घेतला होता का याची चौकशी करावी, सभेचे इतिवृत्त व ध्वनिचित्रमुद्रण सुरक्षित ठेवावे, अहवालाची अधिकृत मराठी आवृत्ती देऊन हरकतींसाठी नव्याने मुदत द्यावी आणि अंतिम निर्णयापर्यंत विकास योजनेची पुढील प्रक्रिया स्थगित करावी, अशा मागण्या शेख यांनी केल्या आहेत.

# १९ तोळे सोन्याचे दागिने लुबाडणाऱ्या तरुणाला पोलिसांनी ठोकल्या बेड्या

नगर – सोशल मीडियावरून अल्पवयीन मुलीशी ओळख वाढवून तिचे रूपांतर प्रेमसंबंधात करणाऱ्या युवकाने आई–वडिल आजारी असल्याचे सांगत तिच्याकडून १९२ ग्रॅम सोन्याचे दागिने घेतल्याचा प्रकार समोर आला आहे. सोने बँकेत गहाण ठेवून त्यावर पैसे घेऊन दागिने परत करण्याचे आमिष दाखवून युवकाने हे सोने लुबाडले. त्यानंतर त्याने सोने नेवासा येथील तीन सोनारांकडे विकले. याप्रकरणी मुलीच्या वडिलांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर पोलिसांनी संशयित युवकाला ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीतून तीन सोनारांकडून १८४ ग्रॅम सोने पोलिसांनी हस्तगत केले.

नेवासा येथील तेजस मारुती परदेशी (वय २३) याची सोशल मीडियाच्या माध्यमातून अहिल्यानगर तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या अल्पवयीन मुलीशी ओळख झाली. सुरूवातीला मैत्री आणि त्यानंतर या ओळखीचे रूपांतर प्रेमसंबंधात झाले. परदेशी याने मुलीची भेट घेऊन तिचा विश्वास संपादन केला. दरम्यान, आपले आई–वडील आजारी असून त्यांच्या उपचारासाठी मोठ्या प्रमाणात पैशांची गरज असल्याचे त्याने मुलीला सांगितले. तसेच, तिच्या घरातील सोन्याचे दागिने आपल्याकडे दिल्यास ते बँकेत गहाण ठेवून त्यावर पैसे काढता येतील आणि पुढे कर्ज फेडून दागिने परत देऊ, असा विश्वास त्याने मुलीला दिला. त्याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून मुलीने घरातील सुमारे १९२ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने त्याच्याकडे दिले.

दागिने मिळाल्यानंतर परदेशी याने सुरूवातीला ते एका पतसंस्थेत तारण ठेवून पैसे घेतले. तारण ठेवलेल्या सोन्याच्या पावत्यांचे फोटो त्याने आपल्या मोबाईलमध्ये काढले. या पावत्यांचे फोटो त्याने मुलीलाही दाखवून आपण सोने तारण ठेवल्याचा विश्वास कायम ठेवला. मात्र, त्यानंतर त्याने पतसंस्थेतून सोने सोडवून घेतले आणि ते विक्री करण्याचा निर्णय घेतला. नेवासा येथील तीन सोनारांकडे सोने विक्रीसाठी गेल्यानंतर सोनारांनी त्याच्याकडे सोन्याच्या पावत्या मागितल्या. त्यावेळी परदेशी याने पतसंस्थेत सोने तारण ठेवल्याच्या पावत्या दाखवल्या. त्यानंतर त्याने संबंधित तीन सोनारांना सोने विक्री करून त्यातून पैसे घेतले.

दरम्यान, मुलीच्या वडिलांनी ११ सप्टेंबर रोजी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार परदेशी याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. सहायक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने तपास सुरु करून परदेशी याला तात्काळ ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याच्याकडे कसून चौकशी केली असता त्याने सोने विकलेल्या सोनारांची नावे सांगितली. त्यानुसार पोलिसांनी संबंधित तीन सोनारांकडून सुमारे १८४ ग्रॅम सोन्याचे दागिने हस्तगत केले. परदेशी याला नोटीस देण्यात आली असून, सोने खरेदी करणाऱ्या तीन सोनारांना या गुन्ह्यात साक्षीदार करण्यात आले आहे, अशी माहिती सहायक निरीक्षक थोरात यांनी दिली.

## राधाबाई खांदवे यांचे वृद्धपकाळाने निधन

नगर – शहरातील श्रीमती राधाबाई बाजीराव खांदवे (वय ८७) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले आहे. त्या अत्यंत धार्मिक प्रवृत्तीच्या होत्या. त्या आई नावानेच सर्वत्र ओळखल्या जात होत्या.



त्यांच्यामागे एक मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. इलाक्षी शो रूमचे जनरल मॅनेजर रामदास खांदवे यांच्या मातोश्री होत.

# शिवनेरी चौकात जुन्या वादातून तरुणावर वीटेने जीवघेणा हल्ला; ४ जणांवर गुन्हा दाखल

नगर– शहरातील स्टेशन रोड परिसरातील शिवनेरी चौक येथे एका खाजगी नोकरी करणाऱ्या तरुणावर विटेने आणि लाथाबुक्क्यांनी जीवघेणा हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी अनिकेत अशोक गरुड (वय २०, रा. शिवनेरी चौक, स्टेशन रोड, अहिल्यानगर, मूळ रा. काळगाव, ता. श्रीगोंदा) हे आपले काम संपवून रात्रीच्या सुमारास घरी जात होते. त्या दरम्यान आरोपी सोयम नन्नवरे (पूर्ण नाव माहित नाही, रा. अचानक चाळ, गौतमनगर, कायनेटीक चौक) व त्याच्यासोबत असलेले इतर तीन अनोळखी इसम तिथे आले.


आरोपींनी अनिकेत गरुड यांच्याशी जुन्या कारणावरून वाद घातला. त्यानंतर त्यांना शिवीगाळ व दमदाटी करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. मुख्य आरोपी सोयम नन्नवरे याने हातातील विट अनिकेत यांच्या डोक्यात मारून त्यांना गंभीर जखमी केले. तसेच सोबतच्या तिन्ही अनोळखी इसमांनी मिळून त्यांना लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली.

या हल्ल्यात फिर्यादी अनिकेत गरुड हे जखमी झाले असून, त्यांनी तात्काळ कोतवाली पोलीस ठाण्यात येऊन घडलेल्या प्रकाराची फिर्याद दिली. पोलिसांनी फिर्यादीच्या जबाबावरून आरोपी सोयम नन्नवरे आणि त्याच्या तीन साथीदारांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

या घटनेचा पुढील तपास कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक राजेंद पालवे हे करत आहेत.


## कांतीलाल कोठारी यांचे संथारा व्रतात निधन

नगर – मे. संदीप कॅन्डल्स, एकता कॉलनी, आगरकर मळा, स्टेशन रोड येथील रहिवासी कांतीलाल चुनीलाल कोठारी (वय ८३) यांचे १५ सप्टेंबर रोजी संथाराव्रतात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. संदीप कोठारी व अनुपमा मुनोत यांचे ते वडील तर सार्थक यांचे ते आजोबा होत.



## भाऊसाहेब लोळगे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – केडगाव, ओंकारनगर येथील रहिवासी भाऊसाहेब पांडुरंग लोळगे (वय ६४) यांचे १५ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. १६ सप्टेंबर रोजी केडगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी व एक मुलगा, १ भाऊ, भावजय असा परिवार आहे. गणेश लोळगे यांचे ते वडील होत. चाफे फरसाणचे ते वितरक होते.




## रामचंद्र भापकर यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – गुंडेगाव येथील रहिवासी माजी सरपंच रामचंद्र बाबुराव भापकर (वय ९३) यांचे १५ सप्टेंबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर वडगाव शेरी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भानुदास, नामदेव, सर्जेराव भापकर यांचे ते वडील होत.



## कारभारी लांडे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी कारभारी दादा बाबूराव लांडे (वय ८५) यांचे १६ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर लांडेवाडी रोड, सोनई येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे, जावई असा परिवार आहे. कौशल्याबाई लांडे यांचे पती, तलाठी अशोक लांडे, सुभाष लांडे, सुनीता मोटे यांचे ते वडील होत.



## डॉ.राजेंद्र लोंढे यांचे अल्प आजाराने निधन

श्रीरामपूर – येथील बेलापूररोड वरील नित्यानंद क्लिनिकचे डॉ.राजेंद्र नामदेवराव लोंढे (वय ६७) यांचे १५ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पक्षात पत्नी, दोन भाऊ, एक बहिण, दोन मुले, सून, पुतणे, नातवंडे असा परिवार आहे. विजेंद्र (अण्णासाहेब) व नरेंद्र लोंढे यांचे बंधू, डॉ.उन्मेश लोंढे व रोहन लोंढे यांचे वडील होत.



# मनोज जरांगे पाटील यांची प्रकृती खालावली

## जागेवरुन उठताही येईना, प्रचंड अशक्तपणा; डॉक्टरांचा गंभीर इशारा

नगर – मराठा आरक्षणाच्या आंदोलनासाठी मुंबईच्या दिशेने निघालेल्या मनोज जरांगे पाटील यांच्या मार्गात मोठा अडथळा आला आहे. उपोषणामुळे मनोज जरांगेंची प्रकृती प्रचंड खालावली आहे. मनोज जरांगे पाटील बुधवारी सकाळी ११ वाजता पाटोद्याहून पुढच्या मुक्कामाला म्हणजे श्रीगोंद्याला रवाना होणार होते. मात्र, आज सकाळपासून मनोज जरांगे यांची प्रकृती खालावली आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील अजूनही झोपून आहेत. त्यांना जागेवरुन हलणेही अशक्य झाले आहे. त्यामुळे आज मनोज जरांगे पाटील पुढच्या मुक्कामला निघणार की बीडच्या पाटोद्यातच आराम करणार, याबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.



काहीवेळापूर्वीच पाटोद्यात डॉक्टरांनी मनोज जरांगे पाटील यांची तपासणी केली. जरांगे यांनी उपचार न घेतल्यास परिस्थिती गंभीर होऊ शकते, असे डॉक्टरांनी म्हटले. आम्ही उपचार घेण्याची विनंती केली. पण मनोज जरांगे ऐकायला तयार नाहीत. मनोज जरांगे यांनी उपचार घ्यायला हवेत, असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीश सोळंके यांनी म्हटले. मनोज जरांगे यांची प्रकृती आम्ही तपासली. त्यांचा रक्तदाब आणि शुगरची पातळी खालवाली आहे. आम्ही आता जरांगेंना सलाईन लावली आहे. मनोज जरांगे यांच्या शरीरात आणखी डिडायड्रेशन झाले तर गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यांचा युरिन रिपोर्ट पाहून पुढचा निर्णय घेतला जाईल. त्यांना रुग्णालयात दाखल करण्याची गरज आहे. आम्ही त्यांना विनंती करुन बघू. त्यांना फक्त सलाईन लावून मुंबईपर्यंत जाता येणार नाही. ते गंभीर डिहायड्रेशनच्या लेव्हलच्या जवळ पोहोचले होते, असेही डॉक्टरांनी सांगितले.

मुंबई पोलिसांनी मनोज जरांगे यांच्या आझाद मैदानातील उपोषणाला परवानगी नाकारली आहे. आतापर्यंत मुंबई पोलिसांनी जरांगे यांचे दोन अर्ज फेटाळले आहे. मनोज जरांगे यांनी तिसऱ्यांदा अर्ज केला असून ते उच्च न्यायालयात जाण्याच्या तयारीत आहेत. दरम्यान, आझाद मैदानात आंदोलन करणाऱ्या मराठा आंदोलकांची माहिती पोलिसांनी मागितल्याचे समजते. जे ५० आंदोलक आंदोलन करणार आहे त्यांचे मोबाईल नंबर आणि डिटेल्स पोलिसांनी मागवले आहेत. सोबतच कोणत्या वाहनातून येणार आहे त्या वाहनांचा तपशीलही पोलिसांनी मागितला आहे. आंदोलनाला कोण पन्नास लोक असणार हे मनोज जरांगे पाटील ठरवणार. त्यानंतर आझाद मैदान पोलीस स्टेशनला ही सर्व माहिती दिली जाणार. ही माहिती दिल्यानंतर पोलीस आंदोलनाला परवानगी देणार की नाही याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### मनोज जरांगे पाटील हायकोर्टात जाणार?

मनोज जरांगे पाटील यांना आझाद मैदानात उपोषण करण्याची परवानगीच्या संदर्भातील कोणतीही याचिका अद्याप मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली नाही. मात्र, त्यांच्याकडून तातडीच्या सुनावणी अंतर्गत परवानगीबाबत याचिका दाखल करण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर मुंबई पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी प्रमुख सरकारी वकील शिशिर हिरे यांच्या भेटीसाठी हायकोर्टात दाखल झाले आहेत. पोलिसांकडून आंदोलनाला परवानगी का नाकारली आहे आणि या आंदोलनाला परवानगी का देण्यात येऊ नये याबाबतचे मत सरकारी वकील शिशिर हिरे यांना मुंबई पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी सांगणार आहेत.

# बस प्रवासात महिलेच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी

नगर – अहिल्यानगर शहरातील तारकपूर बस स्थानक ते नेप्ती नाका दरम्यान बसने प्रवास करत असताना एका प्रवासी महिलेच्या बॅगमधील सोन्याचे दागिने अज्ञात चोरट्याने लांबवल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेली माहिती अशी की, फिर्यादी महिला तारकपूर बस स्थानक ते नेप्ती नाका दरम्यान बसमध्ये सीटवर बसून प्रवास करत होती. यादरम्यान बसमधील गर्दीचा फायदा घेऊन अज्ञात चोरट्याने त्यांच्या जवळील बॅगेची चैन उघडली. त्यानंतर बॅगेतील बरणीमध्ये ठेवलेला ३० हजार रुपये किमतीचा १० ग्रॅम वजनाचा सोन्याचा चॉकर हार आणि ३० हजार रुपये किमतीचे १० ग्रॅम वजनाचे मणीमंगळसूत्र असा एकूण ६० हजार रुपये किमतीचा ऐवज चोरी करून नेला.

आपल्या दागिन्यांची चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर फिर्यादी महिलेने तात्काळ तोफखाना पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दिली. महिलेच्या फिर्यादीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. बसमधील गर्दीचा गैरफायदा घेत चोऱ्या करण्याचे प्रमाण वाढल्याने नागरिकांनी प्रवासादरम्यान आपल्या दागिन्यांची व सामानाची स्वतः काळजी घ्यावी, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# जमिनीच्या बक्षीसपत्राच्या वादातून वृद्धाला मारहाण

नगर – नगर तालुक्यातील चास येथे जमिनीचे बक्षीसपत्र करून देण्याच्या कारणावरून ७८ वर्षीय वृद्धाला मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, चास येथील फिर्यादी दगडू चांगू जाधव हे आपल्या घरी असताना, आरोपी अनिल मोहन जाधव हा त्यांच्या घरासमोर येऊन शिवीगाळ करू लागला. तुझ्या नावाचा हिस्सा माझ्या वडिलांना बक्षीस पत्राद्वारे दे, असे म्हणून आरोपीने वाद घातला. फिर्यादीने नकार दिल्याने संतापलेल्या आरोपीने त्यांना लाथाबुक्क्यांनी आणि हातातील टणक वस्तूने डोक्यात व दोन्ही हातांवर मारहाण केली.

यावेळी भांडण सोडवण्यासाठी आलेली एक महिला नातेवाईक मध्ये पडली असता, आरोपीने तिलाही शिवीगाळ व मारहाण केली. तसेच, जर जमिनीचे बक्षीसपत्र केले नाही, तर तुम्हाला व तुमच्या कुटुंबाला जिवे मारून टाकेल आणि खोट्या केसेसमध्ये अडकवीन, अशी धमकी दिली. जाताना घरातील सायकल उचलून अंगावर फेकल्याने हॅण्डल डोक्यात लागून फिर्यादी जखमी झाले.

या प्रकरणी दगडू चांगू जाधव यांच्या फिर्यादीवरून नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक वारुळे करत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गांजा झाडाची लागवड केल्याप्रकरणी अटक आरोपीस जामीन मंजूर

नगर – केडगाव (ता. जि.अहिल्यानगर) येथील आरोपी विकास बाळू उमाप याने राहते घराजवळ गांजा झाडाची लागवड केलेबाबत गोपनीय माहीती येथील कोतवाली पोलीस ठाण्यात प्राप्त झाली होती. त्यानुसार संबंधित पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी यांनी छापा टाकला असता आरोपीचे घराजवळ काही गांजाची झाडे आढळून आल्याने आरोपीविरुद्ध एन.डी.पी.एस. कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात येऊन आरोपीस अटक करण्यात आली होती.

सदर आरोपी याने अहिल्यानगर येथील जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज सादर केला असता सदरचा जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. कुलकर्णी यांनी मंजूर केला.

याप्रकरणात आरोपीतर्फे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण मार्फत नियुक्त उपमुख्य लोकअभिरक्षक ॲड. प्रसाद गांगर्डे व सहा. लोकअभिरक्षक ॲड. पुनम जानराव–मुनोत यांनी काम पाहिले.

# तोफखाना पोलीस ठाण्यातील गुन्ह्यातील संशयित आरोपीला विशेष न्यायालयाकडून जामीन

नगर – तोफखाना पोलीस ठाण्यात लग्नाचे आमिष दाखवून वारंवार शारीरिक संबंध ठेवल्याच्या आरोपाखाली दाखल असलेल्या गुन्ह्यातील संशयित आरोपीस अहिल्यानगर येथील विशेष जलदगती न्यायालयाचे न्यायाधीश एम. एच. शेख यांनी २५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर आणि अटी–शर्तींसह नियमित जामीन मंजूर केला आहे.

या प्रकरणात आरोपी आणि तक्रारदार यांच्यात ओळख होऊन विवाह ठरला होता. मात्र, नंतर दोघांमध्ये वाद निर्माण झाल्याने तोफखाना पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात येऊन आरोपीला अटक करण्यात आली होती.

सदर जामीन अर्जावर न्यायालयात सुनावणी झाली. आरोपीतर्फे मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथील ॲड. हरीश शरद भांबरे आणि ॲड. ऋषिकेश अशोक ठेंबे यांनी बाजू मांडली. तक्रारदार महिला सज्ञान असून दोघांमध्ये रीतसर विवाह ठरलेला असल्याने आरोपीचा सुरुवातीपासून लग्नाचा हेतू खोटा नव्हता. केवळ नंतर उद्भवलेल्या अंतर्गत वादातून हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असा युक्तिवाद बचाव पक्षाने सर्वोच्च न्यायालयाच्या विविध न्यायनिर्णयांचे दाखले देत न्यायालयात केला.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेत न्यायालयाने नमूद केले की, तक्रारदाराच्या जबाबावरून प्रथमदर्शनी गुन्हा घडल्याचे सिद्ध होत नाही. प्रकरणाचा तपासही पूर्णत्वाकडे असल्याने आरोपीस अधिक काळ कोठडीत ठेवण्याची आवश्यकता नाही. या निरीक्षणासह न्यायालयाने संशयित आरोपीचा जामीन अर्ज मंजूर केला.

# अहिल्यानगरमधील हरेगांव मळ्याच्या खंडकरी शेतकऱ्यांना जमिनी परत मिळणार

नगर – अहिल्यानगर जिल्ह्यातील हरेगाव मळा (ता. श्रीरामपूर) येथील शेती महामंडळाकडील जमिनी मूळ शेतकऱ्यांना किंवा त्यांच्या वारसांना परत करण्यासाठी महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळ बैठकीस मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. त्यानुसार याबाबत विधि व न्याय विभागाच्या सल्लयाने अध्यादेश काढण्यात येणार

हरेगाव येथील या जमिनी ब्रिटीश सरकारने १०४ वर्षांपूर्वी सिंचन सुविधा विकासाठी ताब्यात घेतल्या होत्या. पण त्या द बेलापूर कंपनी लिमिटेड यांना भाडेपट्ट्यावर दिल्या होत्या. त्यानंतर महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ अस्तित्वात आल्यानंतर या कंपनीकडील ७ हजार ३७७ एकर १२ गुंठे पैकी ६ हजार ४२५ एकर १७ गुंठे जमीन अतिरिक्त ठरवून शासनाने ती महाराष्ट्र शेती महामंडळाकडे वर्ग केली होती. यापैकी आपल्या जमिनी परत मिळाव्या यासाठी मूळ शेतकऱ्यांनी आणि त्यांच्या वारसांनी न्यायालयात धाव घेतली होती.

मूळ शेतकऱ्यांना किंवा त्यांच्या वारसांना परत करण्यासाठी महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ मधील कलम २८–१ एए नुसार कार्यवाही करता येत नाही. त्यामुळे सिलिंग कायद्यात सुधारणा करण्यात यावी, असे महसूल मंत्रालयाने प्रस्तावित केले होते. त्यानुसार कलम २८–१ एए मधील पोटकलम ३ मध्ये नवीन पोटकलम ३–१ ब समावेश करण्याचा प्रस्ताव विधि व न्याय विभागाकडे दाखल करण्यात आला होता. त्या प्रस्तावास विधि व न्याय विभागाने मान्यता देऊन सुधारणा करण्यास सहमती दर्शवली आहे. यामुळे या जमिनी भोगवटादार वर्ग–२ म्हणून मूळ मालकांना किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांना परत देण्याचा अधिकार राज्य शासनाला मिळणार आहे. त्यानुसार अधिनियमातील दुरूस्तीचा अध्यादेश काढण्यात येणार आहे.



विनायकराजं प्रतिष्ठाणची गणरायाची प्राणप्रतिष्ठापना उत्साहात झाली.

## विनायकराजं प्रतिष्ठाणच्या गणरायाची प्राणप्रतिष्ठापना उत्साहात

नगर – गुलमोहर रोड येथील 'मानाचा गणपती' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विनायकराजं प्रतिष्ठाणच्या गणरायाची प्राणप्रतिष्ठापना उत्साहात पार पडली. गेल्या १८ वर्षांपासून गुलमोहर रोडवरील हे पहिले सार्वजनिक मंडळ आहे. या सोहळ्यात पहिल्या आरतीचा मान प्रतिष्ठाणचे ज्येष्ठ मार्गदर्शक आणि निवृत्त एअर इंडिया अधिकारी मोहित सर संगमकर यांना देण्यात आला. त्यांच्या हस्ते आरती झाली. यावेळी परिसरातील नागरिक आणि प्रतिष्ठाणचे सदस्य उपस्थित होते.

या गणेशोत्सवानिमित्त प्रतिष्ठाणतर्फे विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये महिलांसाठी विशेष आकर्षण असणारा 'खेळ पैठणीचा' हा कार्यक्रम दरवर्षीप्रमाणे यंदाही विशेष चर्चेत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थापक अध्यक्ष विपुल वाखुरे आणि उपाध्यक्ष विनय वाखुरे यांच्या मार्गदर्शनाखाली पदाधिकारी व कार्यकर्ते मेहनत घेत आहेत. याप्रसंगी योगेश साबळे, प्रदीप वाखुरे, सचिन निक्रड, दहातोंडे सर, अनिल लगड, सार्थक लाहोर, कुणाल लाटे, शंतनु कुलकर्णी, सारंग लाटे, निखिल गोसावी, सोहम साखरे, रुषी उल्हारे, साई शिंदे, अमेय डोक्रस, विशाल लोखंडे, तनुज रोहकले, महेश थोरात, निखिल मोयल, प्रदीप कांडेकर, सुरज कर्डिले, हेमंत रासने, महाना, गर्जे, चंगेडिया, सुराणा, म्हस्के, खंडेलवाल, नंदू भोसले, सुरज लोखंडे, श्रीपाद दगडे, स्वामी देशमुख, डॉ. हर्षल पटारे, सागर गणेश, डाळींबकर प्रकाश यांच्यासह प्रतिष्ठाणचे सदस्य आणि महिला उपस्थित होता.

## निमगाव वाघात पर्यावरणपुरक गणेश मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना

नगर – निमगाव वाघा येथे पर्यावरणपुरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने स्व.पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने शाडूच्या मातीच्या गणेश मुर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.डोंगरे वस्ती येथे ग्रामपंचायत सदस्य तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष नाना डोंगरे यांच्या हस्ते श्री गणेशाची स्थापना करण्यात आली. यावेळी सचिव मंदाताई डोंगरे, युवा मंडळाचे अध्यक्ष पै.संदिप डोंगरे, अजिंक्य वाबळे, कृष्णा डोंगरे, कार्तिक डोंगरे, शिवा डोंगरे, दादा डोंगरे, किरण ठाणगे उपस्थित होते.



गणेश उत्सवानिमित्त निमगाव वाघात संस्थेच्या वतीने विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. व्यसनमुक्ती व पर्यावरणाच्या जागृतीसाठी उपक्रम राबविण्यात येणार आहे. तर जनजागृतीसाठी पथनाट्याचे आयोजन करुन मतदार जागृती, स्त्री जन्माचे स्वागत, स्त्री सक्षमीकरण, व्यसनमुक्तीचा संदेश दिला जाणार आहे. युवकांसाठी स्वच्छता अभियान व वृक्षरोपण अभियान देखील राबविण्यात येणार असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष नाना डोंगरे यांनी दिली.

# प्रेरणादायी अक्षरधन

## प्रतिष्ठेमागे निष्कलंक सामर्थ्य

संकलन: दिशान फिचर्स




बा माणसा, तू मिळव यशः मग सगळं जरी तुला वश लाभेल तुला प्रतिष्ठा.
मग तुझा आवाज निघू दे बदसुरी, तरी लोक म्हणतील वाजली बासरी।
तू म्हणशील ते असेल अगदी असंभव, तरी जग म्हणेल, हा आहे हो अनुभव.
प्रतिष्ठेमुळे माणसाने मांडलेल्या प्रमयेला प्राणाण्य प्राप्त होते.

सामान्य कवीची ही फिर्याद आहे. ते म्हणतात, वाल्मिकिनं लिहिलंय की वानरांनी पर्वत उचलून आणले आणि समुद्रावर सेतू बांधला. हे असंभव व्यासांनी म्हटलंय की अर्जुनानं समुद्रावर सेतू बांधला बाणांचा. हे तर केवळ कपोलकल्पितच. पण वाल्मिकी आणि व्यास हे प्रतिष्ठित कवी. त्यांना कोण नावं ठेवी? आम्ही इकडे दहादा विचार करतो. शब्दांची पुनः पुन्हा निवड करतो. त्याचे अर्थ शंभरदा तपासून घेतो. कल्पना अगदी तोलून मालून घेउन काव्य रचतो. तरी सारे जण आम्हाला फिदीफिदी हसतात. प्रतिष्ठे, तुला कोपरापासून नमस्कार.

तुमच्या विचारामागे लोककल्याणाचा हेतू हवा. तुमच्या कृती हा जनसामान्यांच्या हिताचा अक्षय ठेवा व्हावा, तुमचे चारित्र्य निर्मळ, वृत्ती निरंहकारी व निष्क्षपाती असावी. मग तुमचे बोलणे जणू वेदवाक्य ठरावे. यात नवल कसले? सामर्थ्यांचा महिमाच तसा असतो. समर्थ म्हणेल तर पश्चिमेला देखील सुर्य उगवेल. प्रत्येक जण त्याला अर्घ्यही देईल। तुमच्या ठायी तेवढी पुण्याई मात्र असावी. तुमच्यापायी निष्कलंक व्यवहाराची लोकांना हमी लाभावी. मग तुम्ही म्हणाल ते खरे. तुम्ही कराल ते बरे.

सत्कर्मामुळे मिळणारे सामर्थ्य कधी व्यर्थ कसे जाईल? त्यांच्या सामर्थ्यामुळेच त्याच्या सहवासातील कुत्र्यांनादेखील मान मिळत राहील. मग त्या समर्थ पुरुषाची सेवा करणाऱ्यांना सद्गती लाभेल यात शंका कोण घेईल ? तसे न घडले तर त्या पुण्यपुरुषांचा अपमान होईल. पण असे कोण घडू देईल ? समर्थ पुरुषांची प्रतिष्ठा, पावन करते भक्ताला संत सेना महाराज म्हणतात. की केवळ दर्शनानेदेखील मुक्ती मिळते पतिताला.

लोककल्याणार्थ अवतणाऱ्या परमेश्वराचे नुसते दर्शनदेखील आपले दुःख दुर करते. जिवाला जाळणारी चिंता दूर होते. आत्मविश्वास जागवते. संशयाने अस्वस्थ झालेल्या मनाला शांती मिळते.

एका शाळेत एक सच्छील शिक्षक होता. विद्यार्थ्यांचे हित पाहणारा एक ज्ञानवंत म्हणून त्याला प्रतिष्ठा मिळालेली होती. एकदा चुकून तो वर्गात विद्यार्थ्यांना म्हणाला, ग्रॅड ट्रक नावाचे गाव नकाशात दाखवा. मुले दचकली ग्रॅंड ट्रक हे मद्रासहून दिल्लीला जाणाऱ्या रेल्वेगाडीचे नाव आहे, गोवाचे नाही. तरी मुले बोलली नाहीत.

ही घटना शिक्षकांच्या बसण्याच्या खोलीत कुणीतरी सांगितली. तेथे त्या वेळी मुख्याध्यापकही होते. पण कुणाचीही, त्या शिक्षकाला हसण्याची हिंमत झाली नाही. उलट ग्रॅड ट्रक नावाच्या गावाचे अस्तित्व शिक्षककर्तने सिद्ध करु लागले. ते म्हणाले कलकत्ता मेल कलकत्याला, हावडा एक्स्प्रेस हावड्याला, अहमदाबाद एक्स्प्रेस अहमदाबादला जाते. तशी ग्रॅड ट्रंक एक्स्प्रेस ग्रॅंड ट्रंकला आणि कलकत्ता, हावडा, अहमदाबाद ही गावांचीच नावे, तेव्हा ग्रॅंड ट्रॅक हेही गावाचे नाव असलेच पाहिजे.

– किशोर गांधी

# गणेशोत्सव

भारत हा विविध सण आणि उत्सवांचा देश आहे. त्यापैकी गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील एक अत्यंत लोकप्रिय आणि उत्साहपूर्ण सण आहे. भाद्रपद महिन्यातील शुक्ल चतुर्थीला गणपती बाप्पांची स्थापना केली जाते. या दिवशी घराघरांत आणि सार्वजनिक मंडळांमध्ये गणेशमूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते.

गणेशोत्सवाच्या काळात सर्वत्र आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण असते. गणपतीची सुंदर सजावट केली जाते. वेगवेगळी आकर्षक अशी आरास बाप्पांपुढे केली जाते. सकाळ–संध्याकाळ आरती, भजन आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण या उत्सवात उत्साहाने सहभागी होतात. गणपतीला मोदक हा आवडता नैवेद्य असल्यामुळे या काळात मोदक केले जातात उकडीचे मोदक तळलेले मोदक पुरणाचे मोदक असे वेगवेगळे मोदक प्रत्येकाच्या घरी गणपती बाप्पासाठी केले जातात...

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी इ.स. १८९३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाला व्यापक स्वरूप दिले. त्यामागे समाजातील लोकांना एकत्र आणणे आणि स्वातंत्र्याच्या चळवळीला लोकशक्ती मिळवून देणे हाच खरा उद्देश होता.

गणेशोत्सव आपल्याला एकता, बंधुभाव आणि सामाजिक सहभागाचा संदेश देतो. मात्र उत्सव साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणेही आवश्यक आहे. शाडू मातीच्या मूर्ती, नैसर्गिक सजावट आणि ध्वनिप्रदूषण टाळणे यामुळे आपण पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करू शकतो. आज आपण पाहतो कर्णकर्कश डीजेंचा वापर आपल्या सण समारंभामधे जास्त प्रमाणात केला जातो. सध्याचा माणूस तरुणपणीच अनेक व्याधींना सामोरे जात आहे. तसेच वयोवृद्ध व्यक्तींनादेखील डीजेच्या आवाजाचा भयानक त्रास होतो अनेकांना डीजेच्या आवाजामुळे हार्टअटॅक आलेली उदाहरणे आपण पाहिलेली आहेत... त्यामुळे सणसमारंभ हे पारंपारिक वाद्ये वाजवून तो आनंद स्वतः अनुभवा आणि इतरांनाही त्यामधून आनंद मिळेल अशी वाद्ये वाजवून गणपतीउत्सव साजरा करा. डीजेच्या कर्णकर्कश आवाजाचा अनेकांना त्रास होतो त्यामुळे लग्नसमारंभ आणि आपले सण यामधे डीजेचा वापर नक्कीच टाळू. अनेक मंडळामधे किंवा आपल्या कृष्णाजन्माष्टमी च्या वेळी काही मंडळे सेलिब्रेटी विशेष करून महिलांना आपल्या कार्यक्रमामधे बोलवतात आणि त्यांच्यावर लाखो रुपये खर्च करतात आणि त्या फक्त एखाद्या गाण्यावरच थिरकतात आणि त्यामधेच तरुणाईला तात्पुरता आनंद वाटतो. कशाला बोलवायचे अशा सेलीब्रेटींना कि ज्यांच्यामुळे तरुण मुलांवर विपरीत परिणाम होईल. काय संदेश देऊन जातात हो या सेलिब्रेटी महिला ? अश्लील हावभाव करत नको त्या गाण्यावर नाचत त्या तरुणाईंना भुरळ पाडतात. असे चुकीचे कार्यक्रम आपल्या सणसमारंभांमधे व्हायलाच नको आहेत.. त्यापेक्षा तुमच्या मंडळामधे जी मुले शिक्षणासाठी धडपडतात रात्रंदिवस अभ्यास करतात पन पुस्तकाअभावी फीअभावी मागे पडतात अशा मुलांना शिक्षणासाठी दत्तक म्हणून स्विकारा आणि त्यांचा खर्च उचला.... यासारखे पुण्य नाही. अनेक तरुण मुले बाहेर शिक्षणासाठी जातात पन एकवेळचेच जेवण जेवतात अशांसाठी अन्नदानाची सोय करा. पन वायफट खर्च टाळून चुकीचे कार्यक्रम आपल्या सणसमारंभामध्ये नक्कीच करू नका... पहा पटतय का ?

गणेश विसर्जनाच्या वेळी गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या! असा जयघोष केला जातो. गणेशोत्सव हा केवळ धार्मिक सण नसून आनंद, एकता आणि सामाजिक बांधिलकी जपणारा सण उत्सव आहे. तो आनंदात पार पाडू या आणि इतरांनाही आनंद देऊया आणि बाप्पाच्या चरणी नतमस्तक होऊन सर्वांना सदबुद्धी दे रे गणपती बाप्पा अशी आशा व्यक्त करूया! गणपती बाप्पा मोरया...



सौ. आशा सुधीर साठे
सैनिकपत्नी, अहिल्यानगर
९६०४०५६९२८



**सिद्धेश्वर तरुण मंडळ गणेश मूर्ती**

नगर मधील जंगुभाई तालमीच्या सिद्धेश्वर तरुण मंडळाने हि गणेश मूर्ती स्थापन केली असून मंडळाचे अध्यक्ष राजू मामा जाधव व मार्गदर्शक उपमहापौर धनंजय जाधव आहेत.

# कलंक चतुर्थीचे गूढ

## चंद्राचा दर्पभंग, मन–बुद्धीच्या संघर्षाचे मर्म

## 'भाद्रपद शुक्ल चतुर्थी आणि चंद्रदर्शनाचा दोष!'

लहानपणापासून आपण घराघरांत ऐकत आलो आहोत की, आज भाद्रपद चतुर्थी आहे, आज आकाशात चंद्र पाहायचा नाही; पाहिला तर अंगावर चोरीचा आळ येतो! चुकून जर एखाद्या लहान मुलाची किंवा मोठ्यांची नजर चंद्रावर पडली, तर घरातले ज्येष्ठ लोक घाबरून जातात आणि म्हणतात, शेजाऱ्यांच्या घरावर एक छोटा दगड किंवा खापर फेका (ज्याला ग्रामीण भाषेत 'दगडचौथ' किंवा 'कलंक मुक्तीचा तोडगा' म्हटले जाते), म्हणजे तो दोष टळेल.

ज्या चंद्राला आपण 'चांदोमामा' म्हणून वात्सल्याने हाक मारतो, ज्या चंद्राच्या प्रकाशात कोजागिरी साजरी करतो, ज्याच्या शीतलतेने कवींच्या प्रतिभेला बहर येतो, त्या निष्पाप चंद्राला पाहिल्याने एखाद्या निष्पाप माणसावर चोरीचा खोटा कलंक का लागावा? काय संबंध आहे चंद्राचा, गणपतीचा आणि चोरीच्या खोट्या आरोपाचा?

हा केवळ एक अंधश्रद्धाळू समज आहे, की यामागे आपल्या ऋषीमुनींनी रचलेले एखादे महाप्रचंड खगोलशास्त्रीय, मानसशास्त्रीय, यौगिक आणि सामाजिक विज्ञान दडलेले आहे? पुराणात वर्णन केलेली ती प्रसिद्ध कथा.

गणेश पुराण आणि मुद्गल पुराणातील संदर्भानुसार, एकदा भगवान श्रीगणेश आपल्या भक्तांनी अर्पण केलेल्या मोदकांचा आस्वाद घेऊन आपल्या मूषक वाहनावर आरूढ होऊन कैलासाकडे परत जात होते. रात्र भाद्रपद शुक्ल चतुर्थीची होती. गणरायांचे उदर (पोट) लंबोदर असल्याने मोठे होते, हातात मोदक होते आणि ते एका लहानशा उंदरावर बसून चालले होते.

वाटेत अचानक एका सर्पाने मार्ग ओलांडला. सर्पाला पाहून मूषक भयभीत झाला आणि थरथर कापल्यामुळे गणरायांचे संतुलन बिघडले व ते खाली घसरले. गणपती खाली पडल्याचे पाहून आकाशात चमकणाऱ्या चंद्राला हसू अनावर झाले.

चंद्र हा दिसायला अत्यंत देखणा, तेजस्वी, पांढराशुभ्र आणि मोहक होता. आपल्या या अद्भूत सौंदर्याचा चंद्राला प्रचंड गर्व झाला होता. त्याला वाटले, मी किती देखणा, सुडौल आणि प्रकाशमान आहे; आणि हा काय विचित्र प्राणी आहे – हत्तीचे महाकाय मुख, अवाढव्य पोट, आणि एका लहानशा उंदरावर बसून चालणारा हा विद्रूप देव खाली धडपडला! चंद्राने अहंकाराने मान डोलावून गणरायांचा उपहास केला आणि तो मोठ्याने खो–खो हसला.

श्रीगणेश हे साक्षात विवेकाचे आणि बुद्धीचे अधिष्ठान आहेत. विवेकाला बाह्य सौंदर्याच्या दर्पाचा केलेला उपहास सहन होत नाही. त्यांनी चंद्राकडे पाहिले. चंद्राच्या त्या कुत्सित आणि उपहासात्मक हास्याने गणेशाचा क्रोध अनावर झाला. गणरायांनी चंद्राला सौंदर्य, तेज नष्ट होऊन कलाहीन होण्याचा श्राप दिला.

गणेशाच्या शापवाणीने क्षणात ब्रह्मांडात हाहाकार माजला. चंद्राचे तेज लुप्त झाले, तो काळाठिक्कर पडला. रात्रीचा शीतल प्रकाश नाहीसा झाल्याने वनस्पतींचे पोषण थांबले, समुद्राची भरती–ओहोटी थबकली आणि निसर्गाचे चक्र बिघडले.

आपल्या सौंदर्याचा गर्व गळून पडल्यावर चंद्राला स्वतःच्या घोर चुकीची जाणीव झाली. तो थरथर कापू लागला. सर्व देवता आणि ऋषीमुनी घाबरून गणरायांकडे धावले. त्यांनी गणेशाची स्तुती केली आणि चंद्राला क्षमा करण्याची प्रार्थना केली. शेवटी स्वतः चंद्राने लोटांगण घालून अश्रू ढाळत गणेशाच्या चरणी क्षमायाचना केली.

तेव्हा गणेशानी शाप पूर्णपणे मागे घेता येणार नाही, परंतु त्यात सुधारणा केली जाऊ शकते. असे सांगून सूर्याच्या तेजाने शुक्ल पक्षात तू एका एका कलेने वाढत जाशील आणि पौर्णिमेला पूर्ण स्वरूपात येशील; परंतु कृष्ण पक्षात हळूहळू क्षय होऊन अमावास्येला तू पूर्णतः अंधकारमय होशील. जेणेकरून तुला तुझ्या नश्वरतेची जाणीव राहील. परंतु, ज्या भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या दिवशी तू अहंकाराने माझा उपहास केलास, त्या दिवशी जो कोणी तुझे मुख पाहील, त्याला समाजात खोट्या आरोपांचा, अपयशाचा आणि 'मिथ्या कलंकाचा' सामना करावा लागेल! असा उःशाप देऊन चंद्रकलेचे नियम घालून दिले.



चंद्राने हा दंड नम्रपणे स्वीकारला आणि तेव्हापासून ही तिथी 'कलंक चतुर्थी' किंवा 'चौर चतुर्थी' म्हणून ओळखली जाऊ लागली. ऋग्वेदातील पुरुषसूक्तात एक अत्यंत महत्त्वाचा मंत्र आहे. चन्द्रमा मनसो जातश्चक्षोः सूर्यो अजायत।

अर्थात, विराट पुरुषाच्या (परमात्म्याच्या) मनातून चंद्राची उत्पत्ती झाली आणि डोळ्यांतून सूर्याची उत्पत्ती झाली. ज्योतिषशास्त्र चंद्राचा थेट संबंध मानवी मनाशी आणि भावनांशी आहे. असे मानल्या जाते. आयुर्वेद आणि प्राचीन चिकित्साशास्त्र ही हि गोष्ट अनेकदा आपल्याला सांगते. सूर्य हा 'आत्मा' आहे, तो स्थिर आहे, तो सत्य आहे, तो स्वयंप्रकाशी आहे. तर चंद्र हा 'मन' आहे. चंद्राला स्वतःचा प्रकाश नसतो; तो सूर्याच्या प्रकाशाचे परावर्तन करतो. अगदी तसेच मनाला स्वतःची स्वतंत्र चेतना नसते; ते आत्म्याच्या चैतन्याने चालते. चंद्र आकाशात सतत बदलत राहतो – कधी लहान, कधी मोठा, कधी पूर्ण, तर कधी गायब. अगदी तसेच मानवी मन हे अत्यंत चंचल, अस्थिर आणि सतत चढ–उतारांनी भरलेले असते.

जेव्हा माणसाला संपत्ती, उच्च पद, देखणे शरीर किंवा बुद्धीची देणगी मिळते, तेव्हा त्याचे मन स्वतःलाच सर्वस्व समजू लागते. मन विसरून जाते की, हे सौंदर्य किंवा ही बुद्धी माझी स्वतःची नाही, तर ती त्या परमात्म्याची (सूर्याची) उधारी आहे. मन जेव्हा आत्म्याला विसरून केवळ स्वतःच्या बाह्य कवचावर (सौंदर्यावर) प्रेम करू लागते, तेव्हा तिथे 'दर्प' जन्माला येतो. चंद्राने गणेशावर हसणे ही बाह्य जगातील घटना नसून, आपल्याच चंचल मनाने विवेकावर केलेले कुत्सित हास्य आहे! गणपतीच्या रूपाकडे जरा शांत चित्ताने पाहा. गणपतीचे रूप हे जगातील सर्वात विलक्षण आणि विरोधाभासी रूप आहे: हत्तीचे मुख: हत्ती हा अफाट ताकदीचा, प्रचंड स्मरणशक्तीचा, शांत, गंभीर आणि महाकाय प्राणी आहे. हे 'महाबुद्धी' चे प्रतीक आहे.

मूषक : उंदीर हा जमिनीखाली अंधारात राहणारा, प्रत्येक वस्तू कुरतडणारा, अत्यंत लहान, चपळ आणि चंचल प्राणी आहे. हे 'तर्क आणि सूक्ष्म बुद्धी' चे प्रतीक आहे. उंदीर म्हणजे मानवाचा संशय आणि चंचल तर्क. गणपतीने उंदराला आपले वाहन बनवले, याचा अर्थ असा की विवेकाने आपल्या चंचल, कुरतडणाऱ्या तर्काला आपल्या नियंत्रणात ठेवले आहे!

चंद्र (बाह्य सौंदर्य) : चंद्र म्हणजे केवळ दृष्टीला सुखावणारे, पण आतून पोकळ आणि थंड असणारे बाह्य आवरण. म्हणजेच जेव्हा महाकाय बुद्धी (हत्ती) सूक्ष्म तर्कावर (उंदीर) स्वार होऊन चालते, तेव्हा केवळ बाह्य सौंदर्याने माजलेले उथळ मन (चंद्र) तिची थट्टा करते! आपल्या समाजातही हेच घडते ? ज्या माणसाकडे खरी आंतरिक विद्वत्ता असते, जो साधेपणाने राहतो, त्याच्या साधेपणाची आणि बाह्य रूपाची आजचा चकचकीत समाज थट्टा उडवतो. एखाद्या बुद्धिमान पण साध्या दिसणाऱ्या व्यक्तीला पाहून चकचकीत कपडे घातलेला मूर्ख मनुष्य हसतो. चंद्र हे त्या भौतिकवादी, उथळ आणि दिखाऊ वृत्तीचे प्रतीक आहे, तर गणेश हे अंतरंगातील अथांग ज्ञानाचे प्रतीक आहेत.

गणेशाने चंद्राला दिलेला शाप म्हणजे निसर्गाचा एक नियम आहे: जी गोष्ट बाह्य सौंदर्याच्या जोरावर स्वतःला श्रेष्ठ समजते, तिचा एक दिवस क्षय निश्चित असतो! पुराणात सांगितले आहे की, चतुर्थीचा चंद्र पाहिला की माणसावर 'चोरीचा खोटा आळ'येतो. आता या 'चोरीच्या आळाचा' आणि 'चंद्र दर्शनाचा' काय संबंध? हा प्रश्न निश्चितच पडतो. जर सूक्ष्म विचार केला तर यामागचे मर्म लक्ष्यात येते. चोरी म्हणजे काय? दुसऱ्याचे जे आहे, ते स्वतःचे समजून लपवून घेणे.

चंद्राने नेमके हेच केले होते! चंद्राचा प्रकाश हा त्याचा स्वतःचा नव्हता; तो सूर्याचा होता. परंतु चंद्राने सूर्याचा प्रकाश स्वतःचा मानला आणि स्वतःला सुंदर समजून अहंकार केला – ही एक प्रकारे 'तेजाची चोरी' होती! दुसऱ्याच्या गुणांना स्वतःचे गुण मानून फुगणे ही मानसिक चोरी आहे. या सिद्धांताचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे भागवत पुराणातील 'स्यमंतक मणी आख्यान'! साक्षात भगवान श्रीकृष्ण यांच्यावरही या नियमाचा प्रभाव पडला. कथा अशी आहे की, द्वारकेमध्ये सत्राजित नावाचा एक सूर्यभक्त यादव होता. सूर्याने त्याला प्रसन्न होऊन 'स्यमंतक मणी' दिला होता. हा मणी दररोज आठ भार (सुमारे शेकडो किलो) शुद्ध सोने देत असे. ज्या राज्यात हा मणी राहील, तिथे दुष्काळ, महामारी किंवा दारिद्र्य येत नसे. श्रीकृष्णाने सत्राजितला सल्ला दिला की, हा मणी वैयक्तिक संपत्ती म्हणून ठेवण्यापेक्षा प्रजेच्या कल्याणासाठी राजकोषात ठेवावा. परंतु सत्राजितने लोभापोटी नकार दिला. एकदा भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या रात्री भगवान श्रीकृष्ण गायीचे दूध काढत होते. दुधाच्या पात्रात पाहत असताना अचानक दुधातील पाण्यात त्यांना आकाशातील भाद्रपद चतुर्थीच्या चंद्राचे प्रतिबिंब दिसले! नकळत त्यांच्याकडून चंद्रदर्शन घडले.

काही दिवसांनंतर, सत्राजितचा भाऊ प्रसेनजित तो स्यमंतक मणी गळ्यात घालून जंगलात शिकारीसाठी गेला. तिथे एका सिंहाने प्रसेनजितला ठार मारले आणि तो चमकणारा मणी तोंडात धरून पळू लागला. पुढे जात असताना त्या सिंहाला ऋक्षराज जांबुवंताने (रामायणातील अद्भूत योद्धा) मारले आणि तो मणी आपल्या लहान मुलाला खेळण्यासाठी गुहेत नेऊन दिला. इकडे द्वारकेत प्रसेनजित परत न आल्यामुळे एकच खळबळ उडाली. सत्राजितने थेट भगवान श्रीकृष्णावरच संशय घेतला! त्याने संपूर्ण द्वारकेत दवंडी पिटवली:

कृष्णाची नजर माझ्या मण्यावर पूर्वीपासूनच होती. कृष्णानेच माझ्या भावाला जंगलात कपटाने मारले आणि तो स्यमंतक मणी स्वतः चोरून लपवून ठेवला आहे! ज्या श्रीकृष्णाने द्वारका सोन्याची बनवली होती, ज्याच्या पायाशी संपूर्ण विश्वाची संपत्ती लोळण घेत होती, त्या जगन्नियंत्या कृष्णावर एका मण्याच्या 'चोरीचा नीच आळ' आला! संपूर्ण यादव कुळात श्रीकृष्णाकडे संशयाने पाहिले जाऊ लागले.

हा कलंक धुवून काढण्यासाठी भगवान श्रीकृष्ण स्वतः जंगलात गेले. पावलांचे ठसे शोधत शोधत ते जांबुवंताच्या गुहेत पोहोचले. तिथे सलग २८ दिवस श्रीकृष्ण आणि जांबुवंत यांच्यात घनघोर द्वंद्वयुद्ध झाले. शेवटी जांबुवंताला जाणीव झाली की आपल्याशी लढणारे हे साक्षात आपले प्रभू श्रीराम आहेत. जांबुवंताने श्रीकृष्णाची क्षमा मागितली, आपली कन्या जांबवती हिचा विवाह कृष्णाशी लावून दिला आणि तो स्यमंतक मणी कृष्णाला सन्मानाने परत केला.

श्रीकृष्णाने द्वारकेत परत येऊन भरसभेत सत्राजितला तो मणी दिला आणि आपले निर्दोषत्व सिद्ध केले. सत्राजित लज्जेने मान खाली घालून रडू लागला. त्याने प्रायश्चित्त म्हणून आपली कन्या 'सत्यभामा' हिचा विवाह श्रीकृष्णाशी करून दिला. तेव्हा भगवान श्रीकृष्णाने ऋषींना विचारले, मी तर निष्पाप होतो, मग माझ्यावर असा घोर कलंक का लागला?


तेव्हा नारदमुनींनी त्यांना आठवण करून दिली: हे वासुदेवा, तुमच्याकडून अनावधानाने भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या दिवशी दुधातील पाण्यात चंद्राचे दर्शन घडले होते. हा त्याच शापाचा परिणाम होता! या कथेतुन आपणास काय शिकवण मिळते? तर . निसर्गाचे आणि ऊर्जेचे नियम हे साक्षात ईश्वराच्या अवतारालाही चुकलेले नाहीत; मग आपण तर सामान्य मानव आहोत. जर आपल्या वर कधी विनाकारण खोटा आळ आला, तर खचून जाऊ नका; साक्षात श्रीकृष्णालाही या अग्निदिव्यातून जावे लागले होते. सत्याचा मार्ग कधी सोडायचा नसतो; श्रीकृष्णाने संकटाचा सामना केला आणि शेवटी स्वतःचे सत्य सिद्ध करून दाखवले. शास्त्र केवळ समस्या सांगत नाही, तर त्यावर तोडगाही देते. जर भाद्रपद शुक्ल चतुर्थीच्या दिवशी नजर चुकून चंद्रावर पडलीच, तर शास्त्राने उपाय सांगितले आहेत: पुराणात या दोषाचे निवारण करण्यासाठी एक अत्यंत सिद्ध मंत्र दिला आहे. या मंत्राचा उच्चार करून स्यमंतक मण्याची कथा ऐकावी किंवा वाचावी:

सिंहः प्रसेनमवधीत्सिंहो जाम्बवता हतः।
सुकुमारक मा रोदीस्तव ह्येष स्यमन्तकः।।

या श्लोकाचे श्रवण केल्याने किंवा जप केल्याने मनातील संशय आणि नकारात्मक ऊर्जेचा प्रभाव नष्ट होतो. चंद्राने ज्याप्रमाणे गणेशाची स्तुती करून स्वतःला शापमुक्त केले, त्याचप्रमाणे त्या दिवशी गणपतीला २१ दुर्वा आणि मोदक अर्पण करून 'संकटनाशन गणेश स्तोत्र' किंवा 'गणेश अथर्वशीर्ष' पठण करावे. ग्रामीण भागात या दिवशी शेजाऱ्यांच्या छतावर दगड मारण्याची प्रथा आहे, जेणेकरून शेजारी शिव्या देईल आणि त्या शिव्यांच्या रूपाने आपल्यावरील 'कलंक' किंवा पाप तिथेच संपून जाईल! ही जरी एक विनोदी आणि अंधश्रद्धाळू प्रथा वाटत असली, तरी त्यामागील मूळ मानसशास्त्र असे होते की, माणसाने स्वतःच्या चुकीची शिक्षा त्वरित, एखाद्या छोट्या अपमानाच्या रूपात स्वीकारून मनावरचा अपराधीपणाचा भार हलका करावा. परंतु, दगड मारण्यापेक्षा नामस्मरण आणि आत्मपरीक्षण करणे हाच शास्त्राला अपेक्षित असलेला खरा तोडगा आहे. ।। गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया ।।



रमेश देशपांडे
९४२३७९३२२६



**घरगुती बालाजी मंदिर देखावा**

शहरातील झारेकर गल्लीतील अंजय्या एकलदेवी कुटुंबातील बाल बच्चे कंपनीने आपल्या कल्पकतेतून आणि मेहनतीतून बालाजी मंदिराचा सुंदर व आकर्षक देखावा साकारला आहे. या देखाव्यामध्ये बालाजी मंदिराची आकर्षक प्रतिकृती तयार करण्यात आली असून, सजावट, रोषणाई आणि विविध कलाकृतींचा सुंदर वापर करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, हा देखावा तयार करण्यासाठी कुटुंबातील लहान मुलांनी उत्साहाने सहभाग घेत आपल्या कलागुणांना वाव दिला. (छायाचित्र – ऋषिकेश गुंडला)



**बजरंग मार्कंडेय सेवा मंडळाचा गणेश**

श्री बजरंग मार्कंडेय सेवा मंडळातर्फे यंदा मोरावर विराजमान असलेल्या ११ फुटी गणेशमूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आला.



**श्री सूर्यमुखी गुरुदत्त**

दातरंगे मळा येथील श्री सूर्यमुखी गुरुदत्त दिगंबर युवा विकास प्रतिष्ठान ट्रस्टची आकर्षक गणेशमूर्ती.

# अहिल्यानगरमध्ये २७ सप्टेंबर रोजी लघुनाटिका (स्किट) स्पर्धेचे आयोजन

नगर – होशी प्रायोगिक कलावंत संघ, अहिल्यानगर शाखेच्या वतीने 'वैशाली सरडे स्मृती लघुनाटिका (स्किट) स्पर्धा २०२६' चे आयोजन २७ सप्टेंबर रोजी करण्यात आले आहे. ही स्पर्धा जिल्हा वाचनालय सभागृह, सावेडी शाखा, एलआयसी कॉलनी, गंगा उद्यानाजवळ, जॉगिंग ट्रॅक शेजारी, सावेडी, अहिल्यानगर येथे होणार आहे.

स्पर्धा सर्व वयोगटातील स्पर्धकांसाठी खुली असून प्रत्येक संघात किमान २ आणि कमाल ४ कलाकार असणे आवश्यक आहे. स्किटचे सादरीकरण मराठी भाषेत करावे लागणार असून प्रत्येक संघाला किमान १० व कमाल १५ मिनिटांचा वेळ दिला जाणार आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार असून प्रथम क्रमांकासाठी ५,००० रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३,००० रुपये, तृतीय क्रमांकासाठी २,००० रुपये आणि दोन उत्तेजनार्थ बक्षिसे प्रत्येकी १,००० रुपये देण्यात येतील. तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

स्पर्धेची प्रवेश फी २०० रुपये असून पहिल्या २० अर्जांना प्राधान्य दिले जाणार आहे. स्पर्धेसाठी आवश्यक नेपथ्य, वेशभूषा व प्रॉप्स स्पर्धकांनी स्वतः आणावेत. अश्लील, असभ्य, जातीय किंवा धार्मिक तेढ निर्माण करणारे अथवा कोणत्याही व्यक्ती, समाज किंवा समुदायाचा अपमान करणारे सादरीकरण स्वीकारले जाणार नाही.

अधिक माहितीसाठी अविनाश कराळे ९८२३२९७५२९, रियाज पठाण ९९२२४१९१६८, संदीप येळवंडे ९०४९८२९७७१ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## वंदू गणेशा...



रेखाचित्रकार दिलीप शहापूरकर, माणिकचौक, अ.नगर मो.७९७२९८९७८०



डॉ. भास्कर पांडुरंग हिवाळे एज्युकेशन सोसायटीच्या अहमदनगर महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग संचलित सोशल क्लबच्या वतीने दोन दिवसीय (११ व १२ सप्टेंबर) सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

# समाजशास्त्र विभाग संचलित सोशल क्लबचा सामाजिक उपक्रम स्तुत्य

### प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी यांचे प्रतिपादन

नगर – डॉ. भास्कर पांडुरंग हिवाळे एज्युकेशन सोसायटीच्या अहमदनगर महाविद्यालयातील समाजशास्त्र विभाग संचलित सोशल क्लबच्या वतीने दोन दिवसीय (११ व १२ सप्टेंबर) सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत शहरातील रस्त्याच्या बाजूला राहणाऱ्या गरीब महिला भगिनींसाठी कपड्यांचे वाटप करण्यात आले.

तसेच बालकांसाठी कपड्यांसोबत खेळण्यांचेही वितरण करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत सोशल क्लबने हा उपक्रम राबविला, हा उपक्रम अतिशय स्तुत्य आहे असे प्रतिपादन यावेळी अहमदनगर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉक्टर अभिजीत कुलकर्णी यांनी केले.

समाजशास्त्र विभागप्रमुख तथा सोशल क्लबचे संस्थापक प्रो. डॉ. समीर मोहोपात्रा यांनी सांगितले की, पुढील वर्षभर विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा मानस आहे.

या उपक्रमात प्रा. डॉ. रवींद्र मते, प्रा. अमोल खाडे तसेच विद्यार्थी राहत शेख, शहेजान शेख, रेहान शेख, मादिहा सय्यद, अरबीना शेख, रिहान खान, ताहीर पठाण इत्यादी सहभागी झाले.

# बालरंगभूमी अहिल्यानगर शाखेच्या वतीने पारनेरमध्ये लोककला प्रशिक्षण कार्यशाळेस विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद

नगर – बालरंगभूमी अहिल्यानगर शाखेच्या वतीने आयोजित 'जल्लोष लोककलेचा' या उपक्रमांतर्गत पारनेर येथे लोककला प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात पार पडली. अहिल्यानगर परिसरातील विविध तालुक्यांमधील शाळा आणि विद्यार्थ्यांच्या आग्रहास्तव या विशेष कार्यशाळेचे आयोजन पारनेर येथील अ. ए. सो. च्या सेनापती बापट विद्यालयात करण्यात आले होते. या कार्यशाळेत २५० हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांनी निसर्गरम्य वातावरणात लोककलेचा आनंद लुटला.



बालरंगभूमी अहिल्यानगर शाखेच्या वतीने आयोजित 'जल्लोष लोककलेचा' या उपक्रमांतर्गत पारनेर येथे लोककला प्रशिक्षण कार्यशाळा उत्साहात पार पडली.

कार्यशाळेत लोककलेचे अभ्यासक शिवाजी अटक यांनी विद्यार्थ्यांना पारंपरिक लोककलेची माहिती देत सद्यस्थितीवर प्रकाश टाकला. लोककलेमध्ये विविध वाद्यांची निर्मिती का झाली आणि त्यांची गरज काय, यासारख्या अनेक वास्तववादी मुद्द्यांवर त्यांनी विविध उदाहरणासह मुलांशी थेट संवाद साधला. बालरंगभूमी अहिल्यानगर शाखेच्या श्रिया देशमुख यांनी 'मंगळागौर' या खेळरुपी लोककलेचे महत्त्व व सादरीकरण याबद्दल मार्गदर्शन केले.या कार्यशाळेचे मुख्य आकर्षण म्हणजे सेनापती बापट विद्यालयातीलच विद्यार्थी वैभव अटक आणि पवन अटक यांनी प्रत्यक्ष सादरीकरण करून ते जपत असलेली लोककला उपस्थितांसमोर सादर केली .त्यांच्याकडून प्रेरणा घेत विद्यार्थ्यांनी त्यांना अवगत असलेल्या लोककलांचे उत्स्फूर्त सादरीकरण करत विद्यार्थ्यांसोबतच उपस्थित शिक्षकवृंदही या लोककलेच्या जल्लोषात आनंदाने सहभागी झाले.

या प्रसंगी बोलताना सेनापती बापट विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. श्री. कासार सर यांनी बालरंगभूमी अहिल्यानगर शाखेच्या या कौतुकास्पद उपक्रमाचे विशेष कौतुक केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला बालरंगभूमी मध्यवर्तीचे सदस्य अनंत जोशी यांनी प्रास्ताविक करत आगामी 'जल्लोष लोककलेचा' या स्पर्धेविषयी सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सपना साळुंके यांनी केले तर सुजाता पायमोडे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यशाळा यस्वीतेसाठी प्रसाद भणगे, शैलेश देशमुख, तेजा पाठक आदी परिषदेचे पदाधिकारी कार्यरत होते.

# णमोकार सेवेचे मनोज छाबडा यांना महाराष्ट्र भुषण पुरस्कार प्रदान

छत्रपती संभाजीनगर – नाशिक येथील समारंभात आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनतर्फे महाराष्ट्रातील विविध सामाजिक, उद्योग, सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्तींना महाराष्ट्र भुषण पुरस्काराने गौरविण्यात आले. यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील णमोकार एसएमएस सेवेचे संचालक व सकल जैन समाजाचे कार्यकर्ते मनोज छाबडा यांचा महाराष्ट्र भुषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. मराठी सिनेअभिनेत्री पुजा मालोदे, आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गणेश विटेकर व प्रिया छाबडा यांच्या उपस्थितीत गुरूदक्षिणा सभागृह गोखले एज्युकेशन सोयायटी येथे कार्यक्रम झाला.



नाशिक येथील समारंभात आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनतर्फे छत्रपती संभाजीनगर येथील णमोकार एसएमएस सेवेचे संचालक मनोज छाबडा यांचा महाराष्ट्र भुषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

मनोज छाबडा मागील १५ वर्षापासून णमोकार एस एम एस सेवेच्या माध्यामातून धार्मिक, सामाजिक माहिती संपूर्ण महाराष्ट्रात सोशल मिडियाच्या माध्यामातून समाजामध्ये निशुल्क देण्याचे काम करतात. तसेच सकल जैन अंतर्गत भगवान महावीर चौक येथील महावीर स्तंभाची मागील ६ वर्षापासून स्वच्छता अभियान राबवितात. आतापर्यंत २९ रक्तदान शिबिराचे आयोजन करून अनेक लोकांना जीवनदान देण्याचे कार्य यांनी केले आहे.

# ब्ल्यू डायमंड स्कूलची उत्तुंग झेप

नगर – ज्ञानसंपदा इंग्लिश मीडियम स्कूल येथे संस्कृत श्लोक पाठांतर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी रेडिओ सिटी कार्यक्रमाच्या उद्घोषिका व कलाकार भारती कुलकर्णी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या, तर मीना बेल्हेकर यांनी पर्यवेक्षक म्हणून काम पाहिले. परिसरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला.



ज्ञानसंपदा इंग्लिश मीडियम स्कूल येथे संस्कृत श्लोक पाठांतर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

ब्ल्यू डायमंड स्कूलमधील इयत्ता सहावी व आठवीच्या विद्यार्थ्यांनीही स्पर्धेत सहभाग नोंदविला. इयत्ता सहावीतील श्रवण सुधीर पवार याने 'प्रज्ञाविवर्धन स्तोत्रम्' या संस्कृत श्लोकाचे उत्कृष्ट पाठांतर करून तृतीय क्रमांक मिळविला. प्रमुख अतिथी भारती कुलकर्णी यांच्या हस्ते श्रवण पवारला सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यशस्वी विद्यार्थी श्रवण पवार याचे स्कूलचे प्राचार्य सुजित डोंगरे व उपप्राचार्या शारदा शेळके यांनी अभिनंदन करून त्याचा गौरव केला.

तसेच स्कूलमधील सर्व शिक्षकांनी त्याला शुभेच्छा दिल्या. सारिका पडोळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.







## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठ वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही विद्यमान मालक **कमलेश सुरेश मानकर रा. अवधुत अपार्टमेंट, भिस्तबाग रोड, पवननगर, सावेडी, अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे सदर मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे. खाली नमुद केलेल्या मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत, दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ. अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन** :- डि।। अहिल्यानगर सब डि।। तालुका नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे भिस्तबाग येथील सर्व्हे नं.८/१पैकी मधील प्लॉट नं. ३३ याचे क्षेत्र १७५.00 चौ. यापैकी दक्षिण बाजुकडील ट्विीन बंगलो नं. अे याचे प्लॉटचे क्षेत्रफळ ८८.२८ चौ.मी. व त्यावरील आरसीसी स्ट्रक्चरमधील तळमजल्याचे बांधकाम क्षेत्र ८८.२५ चौ.मी. यामध्ये ४ रुम, संडास बाथरुम, लाईट फिटींग, कॉमन पाण्याची बोअर, हौद, टाकी पुढे मागे मोकळी जागा, कंपाऊंड सह. ही संपूर्ण मिळकत.

**यांसी चतु:सिमा** :-
पुर्वेस :- सर्व्हे नं.८ पैकी, दक्षिणेस :- सर्व्हे नं. ८/१ पैकी ॲमिनिटी,
पश्चिमेस : ६ मी. रस्ता, उत्तरेस : प्लॉट नं. ३३,
चतु:सिमापुर्वक मिळकत दरोबस्त तदंगभुत सर्व वस्तुसुध्दा व इतर वागणुक वहिवाटीचे हक्कासह वरील मिळकत.
अहिल्यानगर, दिनांक :- १६/०९/२०२६

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**
**ॲड. ओंकार पंडीत मोरे**
ऑफिस- गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स,
पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३

# डॉल्बी, डीजे आणि लेझर शोच्या अतिरेकामुळे कान, हृदय, मानसिक आरोग्य व दृष्टीला धोका

### सार्वजनिक सण साजरे करताना लोकांच्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक

नगर – गणपती उत्सव, दहीहंडी, नवरात्रोत्सव, दसरा, दिवाळी यांसारखे सार्वजनिक सण महाराष्ट्रासह संपूर्ण देशात मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरे केले जातात. हे सण आपल्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. मात्र, गेल्या काही वर्षांत सार्वजनिक सण साजरे करण्याच्या पद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणावर बदल झाला असून पारंपरिक वाद्यांची जागा मोठ्या आवाजातील डीजे, डॉल्बी सिस्टीम तसेच मिरवणुकीमध्ये लेझर शोने घेतली आहे. विशेषतः मिरवणुका, सार्वजनिक कार्यक्रम आणि उत्सवांच्या ठिकाणी मोठ्या क्षमतेच्या ध्वनिक्षेपकांमधून होणारा कर्णकर्कश आवाज हा केवळ त्रासदायक नसून त्याचा मानवी शरीरावर दूरगामी परिणाम होऊ शकतो. सतत मोठ्या आवाजाच्या संपर्कात राहिल्याने कानाच्या पडद्यावर ताण येणे, श्रवण क्षमतेवर परिणाम होणे, कानात सतत आवाज येणे, चिडचिड, झोपेचा त्रास, मानसिक ताण आणि एकाग्रतेवर परिणाम होण्याची शक्यता असते. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, गर्भवती महिला तसेच हृदयविकार किंवा इतर आजार असलेल्या व्यक्तींवर मोठ्या आवाजाचा विशेष परिणाम होऊ शकतो.



डॉ. प्रकाश कांकरिया

सार्वजनिक मिरवणुकीमध्ये आणि विविध उत्सवांमध्ये आकर्षण निर्माण करण्यासाठी लेझर शोचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. मात्र, शक्तिशाली लेझर किरण थेट किंवा परावर्तित स्वरूपात डोळ्यांमध्ये गेल्यास डोळ्याच्या आतील अत्यंत संवेदनशील भागावर, विशेषतः रेटिनावर, गंभीर इजा होण्याचा धोका असतो. डोळ्यांच्या रेटिनावर लेझर किरणांचा थेट परिणाम झाल्यास त्यातून कायमस्वरूपी दृष्टीदोष निर्माण होऊ शकतो. काही परिस्थितींमध्ये रेटिनावर भाजल्यासारखी इजा होणे, मध्यवर्ती दृष्टीवर परिणाम होणे आणि गंभीर प्रकरणात कायमची दृष्टी कमी होण्याची शक्यता असते. त्यामुळे मिरवणुकीतील लेझर किरणांकडे थेट पाहणे, त्यांच्याशी खेळ करणे किंवा ते नागरिकांच्या डोळ्यांच्या दिशेने सोडणे अत्यंत धोकादायक आहे. विशेषतः लहान मुले आणि युवक उत्साहाच्या भरात लेझर किरणांकडे थेट पाहतात. हा प्रकार टाळणे अत्यंत आवश्यक आहे. डोळ्यांना झालेली लेझर इजा अनेक वेळा त्वरित लक्षात येत नाही; परंतु त्याचे परिणाम नंतर गंभीर स्वरूपात दिसू शकतात. त्यामुळे उत्सवाच्या नावाखाली दृष्टीशी कोणत्याही प्रकारचा धोका पत्करू नये. सार्वजनिक सण-उत्सव हे समाजाचे आहेत आणि त्यांचे आयोजन करताना नागरिकांच्या आरोग्याचा विचार होणे ही आयोजकांची आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रशासनाने ध्वनी प्रदूषणाबाबतच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याबरोबरच सार्वजनिक ठिकाणी होणार्या धोकादायक लेझर शोबाबतही कठोर भूमिका घेणे आवश्यक आहे. रोटरी क्लब, लायन्स क्लब, विविध सामाजिक संस्था, गणेश मंडळे, युवक मंडळे, शैक्षणिक संस्था आणि स्वयंसेवी संस्थांनी याबाबत व्यापक जनजागृती करावी.

सण-उत्सव हे आनंददायी, सांस्कृतिक आणि आरोग्यदायी वातावरणात साजरे करण्याची गरज आहे. डीजे, डॉल्बी आणि धोकादायक लेझर शोच्या अतिरेकाला आळा घालून पारंपरिक व सुरक्षित पद्धतीने उत्सव साजरे करावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य नेत्रतज्ज्ञ संघटनेचे अध्यक्ष व नेत्रतज्ज्ञ डॉ. प्रकाश कांकरिया यांनी केले आहे. त्यांनी पुढे नागरिकांना आवाहन करताना म्हटले की, 'आपल्या एका चुकीच्या उत्सवी निर्णयामुळे एखाद्या व्यक्तीच्या कानाची श्रवणशक्ती किंवा डोळ्यांची दृष्टी कायमची बाधित होऊ नये. उत्सव साजरा करताना स्वतःच्या तसेच आपल्या कुटुंबीयांच्या आणि समाजातील प्रत्येक नागरिकाच्या आरोग्याची काळजी घेणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे.' आपल्या महाराष्ट्राच्या समृद्ध परंपरेमध्ये सनई, चौघडा, ताशा, ढोल, वाजंत्री यांसारख्या पारंपरिक वाद्यांना विशेष स्थान आहे. उत्सवाचा खरा आनंद हा मोठ्या आवाजात नसून एकत्र येण्यात, संस्कृती जपण्यात, सामाजिक सलोखा वाढविण्यात आणि आनंद वाटण्यात आहे. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा अतिरेक टाळून आपल्या पारंपरिक उत्सवांची ओळख जपण्याची गरज आहे. सण हे समाजाला जोडण्यासाठी असतात; समाजाच्या आरोग्याला धोका निर्माण करण्यासाठी नव्हे. उत्सव समित्या, मंडळांचे कार्यकर्ते आणि युवकांनी याबाबत स्वयंशिस्त पाळली तर प्रशासनावरही नियंत्रण ठेवण्याचा अतिरिक्त ताण येणार नाही.

महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत उपक्रम)
कुकडी पाटबंधारे विभाग क्र. १ नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे
ई-मेल पत्ता :- eekid1narayangaon@gmail.com दूरध्वनी क्र. ०२१३२-२४२०१६

## बी-१ निविदा सुचना क्र. २ सन २०२६-२७

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र. १, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरीता निविदा मागवित आहेत. सविस्तर निविदा सूचना शासनाच्या http://wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.
निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, कुकडी पाटबंधारे विभाग क्र. १, नारायणगाव, ता. जुन्नर, जि. पुणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. सदर निवीदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास विभागीय कार्यालयाच्या सुचना फलकावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा किंमत (रुपयात) | इसारा/बयाना रक्कम रु. | निविदा फी | ठेकेदाराचा वर्ग | जिल्हा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुकडी सिंचन शाखा, अळकुटी अंतर्गत को.प.बंधारा रेनवडी, बाबरमळा, वडनेर ता. पारनेर जि. अहिल्यानगर या को.प.बंधाऱ्याचे बर्गे बसविणे | ८,३१,१७५/- | ८३००/- | ११८०/- | वर्ग ७ व त्यावरील | अहिल्यानगर |

निविदा उपलब्ध कालावधी - दिनांक १७/०९/२०२६ ते दिनांक २४/०९/२०२६
निविदा उघडण्याचा दिनांक २८/०९/२०२६
जा.क्र.कुपावि-१/लेशा/३३२९/ सन २०२६
कुकडी पाटबंधारे विभाग क्र. १, नारायणगांव,ता.जुन्नर जि. पुणे.
दिनांक- ८/०९/२०२६ जिमाका/नगर/जाहि/११८/२०२६

(जी. बी. नान्नोर .)
कार्यकारी अभियंता
कुकडी पाटबंधारे विभाग क्र. १,
नारायणगांव, ता. जुन्नर, जि. पुणे.




# योगशिक्षक पदविका व एम.ए. योगशास्त्र प्रवेशासाठी ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

नगर – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या योगशिक्षक पदविका व एम.ए. योगशास्त्र या अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची मुदत ३० सप्टेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती योग विद्या धाम, अहिल्यानगरच्या कार्याध्यक्षा सौ. मीना देशपांडे यांनी दिली.

योगशिक्षक पदविका अभ्यासक्रमासाठी १८ वर्षांवरील व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे. तसेच एम.ए. योगशास्त्र या अभ्यासक्रमासाठी कोणत्याही शाखेतील पदवीधरांना प्रवेश घेता येणार आहे. योगशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही संधी उपलब्ध झाली असून, योगप्रेमींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्राचार्य माणिक अडाणे व डॉ. विश्वनाथ काळे यांनी केले आहे.

प्रवेशासाठी योग विद्या धाम, योग भवन, ज्ञानेश्वर मोटार ड्रायव्हिंग स्कूलमागे, कुष्ठधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे संपर्क साधावा. अधिक माहितीसाठी ०२४१-२४२१२५५ या क्रमांकावर सकाळी १० ते दुपारी १ व सायंकाळी ४ ते ७ या वेळेत संपर्क साधता येईल. मोबाईल क्रमांक ९४२३६७६०५९.



## ...आणि इंटरनेटचं व्यसन सुटलं

सध्याच्या इंटरनेटच्या जगात लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकालाच स्मार्टफोनचं व्यसन लागलं आहे. बरीच मुलं स्मार्टफोन हातात घेऊन तासनतास गेम खेळत बसतात. सोशल मीडियावर पडिक असतात. ही मुलं मैदानी खेळ खेळत नाहीत, वाचत नाहीत, अभ्यासातही मागे पडतात. मग अशा मुलांना या व्यसनातून बाहेर काढण्यासाठी पालक निरनिराळ्या कल्पना लढवतात. कॅनडामधल्या कॅलगरीमध्ये राहणाऱ्या जेमी क्लार्क यांनीही आपल्या मुलाचं स्मार्टफोनचं व्यसन सोडवण्यासाठी अजब युक्ती लढवली. त्यांचा १८ वर्षांचा मुलगा खोबे सतत फोनमध्ये डोकं खुपसून बसायचा. मग जेमी यांनी त्याला मंगोलियातल्या दुर्गम परिसरात नेलं. तिथे इंटरनेटच काय, वाहतुकीचीही सोय नव्हती. मंगोलिया कॅनडापासून आठ हजार किलोमीटर लांब आहे. जेमी यांनी मुलासोबत २२०० किलोमीटर अंतर कापलं. या काळात जेमी खोबेला वेगवेगळ्या ठिकाणी घेऊन गेले. त्यांनी बाईकवरून प्रवास केला, घोड्यावरून फिरले. डोंगराळ भागात तंबूमध्ये राहिले. खोबेला हे वातावरण खूप आवडलं. या प्रवासादरम्यान त्याला मोबाईल वापरता आला नाही. यामुळे खोबेचं मोबाईलचं व्यसन कमी झालं. इंटरनेट वापरलं नाही तर त्याची खूप चिडचिड होत असे. पण या प्रवासामुळे त्याची ही सवय सुटली. आता तो आपल्या कुटुंबासोबत वेळ घालवतो. भरपूर गप्पा मारतो, वाचन करतो. हे जग इंटरनेटपेक्षाही खूप सुंदर आहे याची जाणीव खोबेला झाली.

## रेस्टारंटची स्वच्छता सरासरीइतकीच!



एका ताज्या सर्वेक्षण अहवालानुसार, केवळ ३२ टक्के लोकांनी त्यांच्या शहरातील किंवा परिसरातील वातानुकूलित रेस्टॉरंटची स्वच्छता आणि अन्न सुरक्षा 'चांगली' किंवा 'खूप चांगली' असल्याचे म्हटले आहे. ४२ टक्के लोकांनी ती 'सरासरी' असल्याचे तर नऊ टक्के लोकांनी 'वाईट' किंवा 'खूप वाईट' असल्याचे म्हटले आहे. या सर्वेक्षणात देशभरातील २४४ जिल्ह्यांमधील ९१ हजारांहून अधिक लोकांनी भाग घेतला होता. यांपैकी ६४ टक्के पुरुष आणि ३६ टक्के महिला होत्या. सुमारे ४७ टक्के लोक टियर-१ शहरांमधून, ३३ टक्के टियर-२ शहरांमधून आणि २० टक्के टियर-३ व ४ शहरांमधून होते.

सर्वेक्षण अहवालातून असे दिसून आले आहे, की ७९ टक्के लोकांसाठी अस्वच्छ स्वयंपाकघर, जेवणाची जागा आणि स्वच्छतागृहे या सर्वात जास्त नापसंतीच्या गोष्टी आहेत. ७४ टक्के लोकांना उरलेले किंवा शिळे अन्न पुन्हा वापरण्याबद्दल चिंता वाटते. ७२ टक्के लोकांनी स्वयंपाकाचे तेल पुन्हा वापरण्याचाही उल्लेख केला. याव्यतिरिक्त, ६३ टक्के लोकांनी खराब पद्धतीने साठवलेल्या किंवा मुदत संपलेल्या वस्तूंबद्दल सांगितले. ६१ टक्के लोकांनी कीटक आणि कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक स्वच्छतेवर लक्ष केंद्रित केले. सर्वेक्षणातून हेही समोर आले आहे, की त्यांना रेस्टॉरंटच्या स्वच्छतेबाबत अधिक कठोर नियम हवे आहेत. सुमारे ७४ टक्के प्रतिसादकांनी रेस्टॉरंट्स आणि फूड डिलिव्हरी प्सवर स्वच्छतेचे रेटिंग प्रदर्शित करण्याची मागणी केली.

# कॅलिडोस्कोप



## इथल्या महिला आहेत चिरतरूण

वय वाढल्याच्या खुणा चेहऱ्यावर दिसू लागतात. तारुण्य सरल्यानंतर चेहऱ्यावर सुरकुत्या पडतात. म्हणूनच महिला आणि पुरुष तरुण दिसण्यासाठी खूप प्रयत्न करतात. महिला ब्युटी पार्लरमध्ये जातात. कॉस्मेटिक सर्जरी करून घेतली जाते. पुरुषही वेगवेगळे उपचार करून घेतात. मात्र तैवानमधल्या महिलांचं सौंदर्य टिकून राहतं. या महिला चिरतरुण दिसतात. इथल्या महिलांचं वय वाढलं तरी त्या तरुणच दिसतात. तैवान हे एक बेट आहे. तैवान हा चीनचा एक भाग आहे. एक देश म्हणून तैवानचे जगातल्या १७ देशांशी संबंध आहेत. इथल्या महिला खूप सुंदर असतात आणि बराच काळपर्यंत तरुण दिसतात. मात्र या सौंदर्याचं रहस्य त्यांचा आहार किंवा मेक अप नाही तर वेगळ्याच कारणामुळे त्या चिरतरुण राहतात. तैवानमधल्या महिला आपल्या रुपाला खूप जपतात. त्यामुळे या महिला उन्हात बाहेर पडत नाहीत. उन्हात बाहेर पडल्यामुळे आपण काळे होऊ अशी भीती त्यांना वाटते. इथल्या महिला पावसातही भिजत नाहीत. तैवानमधल्या लोकांना खेळायला आवडतं. त्यामुळे ते तंदुरुस्तही असतात. याच कारणामुळे इथल्या महिला चिरतरुण दिसतात.




## इवलेसे देश

आपला देश आकाराने खूप मोठा आहे. या जगात १९५ देश आहेत. काही देशांचा आकार खूप मोठा आहे तर काही देश आकाराने खूपच लहान आहेत. या देशांची नावंही आपल्याला माहीत नसतील. अशाच काही देशांची ओळख कुतुहलजनक आहे. भूमध्य समुद्रात माल्टा नावाचा देश आहे. हा देश सात बेटांचा समूह आहे. या देशाचं क्षेत्रफळ फक्त ३१६ चौरस किलोमीटर आहे. या देशाची लोकसंख्या फक्त साडेचार लाख इतकी आहे. १९६४ मध्ये माल्टा स्वतंत्र झाला. या देशावर बऱ्याच राष्ट्रांनी राज्य केलं. हिंदी महासागरातला मालदीवही जगातल्या काही छोट्या देशांपैकी एक आहे. लोकसंख्या आणि क्षेत्रफळाचा विचार केला तर मालदीव हा आशिया खंडातला सर्वात लहान देश आहे. २९८ चौरस किलोमीटर परिसरात पसरलेल्या या देशाची लोकसंख्या साडेचार लाखांच्या आसपास आहे. मालदीवला १९६६ मध्ये स्वातंत्र्य मिळालं. इथे पर्यटक मोठ्या संख्येने येतात. कॅरेबियन समुद्रात सेंट किट्स आणि नेविस हे दोन देश आहेत. ही दोन सुंदर अशी बेटं आहेत. त्यांचा शोध ख्रिस्तोफर कोलंबसने लावला होता. सेंट किट्स १६८ चौरस किलोमीटर तर नेविस ९३ किलोमीटर परिसरात पसरला आहे. पॅसिफिक महासागरात मार्शल हा बेटांचा समूह आहे. हा सुद्धा एक देश आहे. इथे १०० पेक्षा अधिक बेटं आहेत. या देशाचं संविधान आणि झेंडाही आहे. अमेरिकन डॉलर हे इथलं चलन आहे.

## २२ व्या वर्षी अब्जाधीश

केवळ वयाच्या अवघ्या २२ व्या वर्षी अब्जाधीश होणं एखाद्या स्वप्नासारखं वाटू शकतं; पण दक्षिण कोरियाच्या किम जंग युन बाबत हे प्रत्यक्षात घडलंय. फोर्ब्सच्या २०२६च्या वर्ल्ड बिलेनियर यादीत किमचं नाव नोंदवलं गेलं आहे. जगातील सर्वात कमी वयाची महिला टेक अब्जाधीश म्हणून तिचं नाव सर्वात वर आहे. स्टार्टअप सुरू करून तिनं एवढी मिळकत मिळवली नाहीये, तर वडिलांनी तयार केलेल्या नेक्सॉन गेमिंग कंपनीतून तिला तिच्या वाट्याचा हिस्सा मिळाल्याने ती रातोरात अब्जाधीश झाली आहे.

फोर्ब्सच्या मते, २०२६च्या लिस्टमध्ये किम जंग युनची नेटवर्थ सुमारे १.७ अब्ज डॉलर आहे. तिची संपत्ती १४ हजार कोटीची आहे. किम दक्षिण कोरियाची आहे. तिच्या संपत्तीचा मुख्य सोर्स ऑनलाईन गेमिंग आहे. फोर्ब्सच्या यादीत ती जगातील सर्वात कमी वयाची म्हणजे २२ व्या वर्षी अब्जाधीश झालेली तरुणी आहे. वयाच्या २० व्या वर्षी अब्जाधीश झाल्याचा विक्रम एमिली वायगट हिच्या नावे आहे. त्यामुळेच किमला जगातील सर्वात कमी वयाची टेक महिला अब्जाधीश म्हणणं अधिक योग्य ठरणार आहे. किम जंग युनचे वडील किम जंग जू यांनी १९९४मध्ये नेक्सॉन कंपनीची सुरुवात केली होती. या कंपनीने ऑनलाइन गेमिंगच्या जगात मोठा बदल घडवून आणलेला आहे.

'नेक्सॉन'ने 'मॅपल स्टोरी', 'कार्टरायडर', 'ड्रुंगेन अँड फायटर' सारखे गेम तयार केले. हे गेम जगभरात प्रचंड लोकप्रिय आहेत. 'फोर्ब्स'च्या मते, ही कंपनी ८० हून अधिक लाइव्ह गेम चालवते. ७२ हून अधिक देशांमध्ये त्यांचे यूजर्स आहेत. किम जंग जू यांनी केवळ गेम बनवण्यावर लक्ष दिलं नाही, तर मोफत गेम खेळता येईल, असं ऑनलाईन गेमिंगचं एक असं मॉडेल तयार केलं. 'नेक्सॉन'ला फ्री टू प्ले' मॉडेलचा मोठा खिलाडी मानलं जात आहे. हेच मॉडेल नंतर संपूर्ण गेमिंग इंडस्ट्रीमध्ये लोकप्रिय ठरलं आहे.

किम जंग युनच्या आयुष्यात सर्वात मोठा बदल २०२२मध्ये आला. तिचे वडील किम जंग जू यांचं वयाच्या ५४ व्या वर्षी निधन झालं. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या मुली किम जंग मिन आणि किम जंग युन यांना कुटुंबाच्या कंपनीतील मोठा हिस्सा मिळाला.



उमललेलं फूल खूप सुंदर दिसतं. शास्त्रज्ञांना जगातलं सर्वात मोठ्या आकाराचं उमललेलं फूल सापडलं आहे. इंडोनेशियातल्या पश्चिम मध्य सुमात्रा बेटांवरच्या जंगलांमध्ये हे फूल सापडलं आहे. हे फूल खूपच अनोखं आणि सुंदर आहे. हे महाकाय फूल बघून शास्त्रज्ञही चाट पडले. हे फूल चार चौरस फूट परिसरात पसरलं आहे. या फुलाला रेफलिसिया

## अबब... केवढं मोठं हे फुल!



म्हटलं जातं. २०१७ मध्ये याच जंगलात तीन फूट लांबीचं आणि बारा किलो वजनाचं याच जातीचं फूल सापडलं होतं. ते त्यावेळचं सर्वात मोठं उमललेलं फूल होतं. मात्र आता या फुलाचा विक्रम मोडीत निघाला आहे. रेफलिसिया हे परजीवी फूल असून यातून सुगंध नाही तर दुर्गंध येतो. या फुलाची रचना सूर्यफुलासारखी असते. मात्र त्याचा रंग केशरी, आकाशी किंवा पांढरा असतो. हे फूल वर्षातले काही महिने उमलतं. ऑक्टोबरमध्ये हे फूल उमलू लागतं आणि मार्चपर्यंत पूर्णपणे उमलतं. काही काळानंतर हे फूल मरून जातं.





## समाजसेवेचे माध्यम!

काहींसाठी मुंबईची लोकल ट्रेन ऑफिसला जाण्यासाठीची सोय आहे, तर काहींसाठी थकव्याचे कारण आहे आणि इतरांसाठी गर्दी आणि धक्काबुक्कीचा रोजचा त्रास आहे; पण या धावपळीच्या जीवनात, मुंबई लोकल ट्रेनमध्ये असे काही लोक आहेत जे दररोज भक्ती, श्रद्धा आणि माणुसकीचे एक अनोखे चित्र सादर करतात. भाईंदर ते दादरला जाणाऱ्या सकाळी १०:२० च्या लोकल ट्रेनमध्ये असाच एक सुंदर उपक्रम पाहायला मिळाला. याच लोकल ट्रेनमधून प्रवास करणाऱ्या 'ओंकार भजन मंडळी चॅरिटेबल ट्रस्ट'ने आपला२१ वा वर्धापनदिन एका अनोख्या पद्धतीने साजरा केला. या विशेष प्रसंगी, त्याच देवी दुर्गेला ५६ भोगाचा नैवेद्य अर्पण करण्यात आला, दुर्गेच्या फोटोसमोर मंडळीचे सदस्य धावत्या लोकल ट्रेनमध्ये पूजा, भजन आणि आरती करतात.

मंडळीचा २१ वा वर्धापनदिन उत्साहाने आणि भक्तीभावाने साजरा करण्यात आला. विशेष गोष्ट अशी होती, की प्रत्येक सदस्याने घरून काहीतरी तयार पदार्थ किंवा प्रसाद आणला होता. धावत्या लोकल ट्रेनमध्ये देवी दुर्गेला नैवेद्य अर्पण करण्यात आला. त्यानंतर पूजा, आणि आरती झाली. सदस्यांनी केक कापून आनंद साजरा केल्यामुळे आधुनिकतेचा स्पर्शही स्पष्टपणे दिसून येत होता. ट्रेनमधील प्रवाशांनीही हे आनंददायी आणि भक्तिपूर्ण वातावरण अनुभवले आणि त्यात सहभागी झाले. मिळालेल्या माहितीनुसार, या भजन मंडळीची स्थापना ६ ऑगस्ट २००६ रोजी झाली. तेव्हापासून, या गटाचे काही सदस्य दररोज सकाळी १०:२० वाजता भाईंदरहून सुटणाऱ्या पश्चिम रेल्वेच्या लोकल ट्रेनने प्रवास करतात. ते भजन आणि आरती गात आपला रोजचा प्रवास करतात. काही काळासाठी, गर्दीने भरलेल्या प्रवाशांमध्ये तो डबा एका छोट्या भक्तिकेंद्रात रूपांतरित होतो. या गटाचे वैशिष्ट्य केवळ भजन आणि प्रार्थनेपुरते मर्यादित नाही.

## बकरीची रहस्यमय घटना



मंदिराच्या परिसरात एक बकरी दररोज दिसते; मात्र तिच्याजवळ जाण्याचा प्रयत्न केला, की ती अचानक डोळ्यांसमोरून गायब होते. हिमाचल प्रदेशातील कुल्लू जिल्ह्यातील झीरी येथील जोगनी माता मंदिरातील एका बकरीची कथित रहस्यमय घटना सध्या 'सोशल मीडिया'वर चर्चेचा विषय बनली आहे.

हिमाचल प्रदेशला देवभूमी म्हणून ओळखले जाते. येथील मंदिरं, धार्मिक परंपरा आणि स्थानिक श्रद्धांना मोठे महत्त्व आहे. अशातच कुल्लू जिल्ह्यातील झीरी येथील जोगनी माता मंदिर परिसरात गेल्या सुमारे तीन महिन्यांपासून एक बकरी सातत्याने दिसत असल्याचा दावा केला जात आहे. व्हायरल होत असलेल्या माहितीनुसार, स्थानिक नागरिक आणि मुलांच्या म्हणण्यानुसार ही बकरी जवळपास तीन महिन्यांपासून मंदिर परिसरातील ठराविक ठिकाणी दिसत आहे. सामान्यतः पाळीव किंवा भटक्या जनावरांची हालचाल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी होत असते; मात्र या बकरीची ठराविक पद्धतीने होणारी ये-जा अनेकांच्या कुतूहलाचा विषय ठरली आहे.

स्थानिकांच्या दाव्यानुसार, ही बकरी अनेकदा संध्याकाळी साधारण सात वाजण्याच्या सुमारास मंदिर परिसरात येते. त्यानंतर पहाटे पाच वाजण्याच्या आसपास पुन्हा एका ठराविक ठिकाणी जाऊन बसते, असा दावा करण्यात आला आहे. दिवसभरही ही बकरी मंदिराच्या आसपास फिरताना आणि परिसराला चक्कर मारताना दिसत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे काही भाविक या घटनेकडे केवळ योगायोग म्हणून पाहत नाहीत, तर तिचा संबंध जोगनी मातेशी जोडून पाहत आहेत. या बकरीच्या आहाराबाबतही वेगवेगळे दावे समोर येत आहेत. काही स्थानिकांच्या मते, ही बकरी रात्रीच्या वेळी गवत किंवा चारा खाते, तर काही प्रत्यक्षदर्शी असे सांगतात, की त्यांनी या बकरीला कधी काही खाताना किंवा पाणी पिताना पाहिलेलेच नाही. यामुळे बकरीच्या वर्तनाबाबत आणखी प्रश्न निर्माण झाले आहेत; मात्र या दाव्यांची स्वतंत्रपणे अधिकृत पुष्टी झालेली नाही.

या संपूर्ण प्रकरणाला रहस्यमय वळण देणारा दावा म्हणजे बकरी अचानक गायब होत असल्याचा. रस्त्यावरून जाणाऱ्या काही लोकांनी दूरून बकरीला पाहिले; मात्र तिच्याजवळ जाण्याचा किंवा तिला तिथून आणण्याचा प्रयत्न केला असता ती क्षणार्धात नजरेआड झाल्याचे काहींचे म्हणणे आहे. या दाव्यामुळे 'सोशल मीडिया'वर या बकरीबाबत विविध चर्चा सुरू झाल्या आहेत. काहीजण याला मंदिराशी संबंधित एखादी अलौकिक घटना मानत आहेत, तर काहीजण याकडे केवळ प्राण्याच्या नैसर्गिक वर्तनाच्या दृष्टीने पाहत आहेत.

## आई होण्याचा निर्णय लांबणीवर



'टेक इंडस्ट्री'तील नोकर कपातीचा धोका आता फक्त नोकरी आणि कमाईपुरता मर्यादित राहिलेला नाही. याचा परिणाम लोकांच्या खासगी आयुष्यावर आणि मोठ्या निर्णयांवरही होऊ लागला आहे. 'मेटा' कंपनीच्या एका महिला कर्मचाऱ्याच्या कथेने याच मुद्द्यावर 'सोशल मीडिया'वर नवीन चर्चा सुरू केली आहे. या महिलेने दावा केला आहे, की कंपनीत नोकरी जाण्याची सततची चिंता असल्यामुळे तिने सध्या आई होण्याचा निर्णय पुढे ढकलला आहे.

महिलेने स्वतःची ओळख जाहीर न करता 'ब्लाईंड' नावाच्या प्लॅटफॉर्मवर आपली बाजू मांडली. 'ब्लाईंड' हे असे 'ऑनलाइन फोरम' आहे, जिथे 'व्हेरिफाइड' कर्मचारी अनामिक पद्धतीने आपले अनुभव शेअर करतात. तिने सांगितले, की 'मेटा'मधील भविष्याबाबत वाढत्या अनिश्चिततेने कुटुंब सुरू करण्यासारखा निर्णय घेणेही कठीण बनवले आहे. महिलेच्या मते, अलीकडे पतीसोबत झालेल्या संभाषणाने तिला जाणवले, की नोकरीची चिंता त्यांच्या आयुष्याला किती प्रमाणात प्रभाव करत आहे. तिने लिहिले, की तिने 'मेटा'मध्ये काम करताना मुलाला जन्म देण्याचा विचार सोडून दिला आहे. तिची सर्वात मोठी चिंता कंपनीत वारंवार होणाऱ्या नोकर कपात आणि बदलत्या प्राधान्यक्रमांबद्दल आहे. याशिवाय, मोबदला आणि नोकरीच्या स्थैर्याबाबतही तिला विश्वास वाटत नाही. तिला भीती आहे, की ती आता आई झाली, तर कदाचित काही काळानंतर तिची नोकरीच राहणार नाही.

महिलेने आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे, की तिला पुढच्या वर्षीही ती 'मेटा' मध्ये काम करत असेल, याची कोणतीही हमी दिसत नाही. अशा स्थितीत 'मॅटर्निटी लीव'नंतर पुन्हा नोकरीवर परत येईपर्यंत नोकरी सुरक्षित राहील, अशी अपेक्षा करणेही तिच्यासाठी कठीण आहे. हीच अनिश्चितता तिच्यासाठी सर्वात मोठी समस्या बनली आहे. ती आई होऊ इच्छिते; पण नोकरीबाबतचा सततचा धोका तिला हा निर्णय घेण्यापासून रोखत आहे. ही बाब फक्त पैशांपुरती मर्यादित नाही. महिलेने अशीही चिंता व्यक्त केली की, वेळ तिच्या बाजूने नाही. तिने आपल्या पोस्टमध्ये लिहिले आहे, की तिचे 'बायोलॉजिकल क्लॉक' वेगाने पुढे सरकत आहे. म्हणजेच ती दीर्घकाळ वाट पाहत राहिली, तर नंतर तिच्याकडे आई होण्याचा पर्यायच राहणार नाही. अशा स्थितीत तिच्या मनात असाही प्रश्न आहे, की नोकरी गमावण्याचा धोका तिला आयुष्यातील सर्वात महत्त्वाच्या निर्णयांपैकी एकापासून वंचित तर करणार नाही ना?



राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पावन भूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे बुधवारी पर्युषण पर्वातील सामूहिक क्षमापना कार्यक्रम पार पडला.

# ‘खमाव खमाव’च्या गजरात आनंद तीर्थ समवशरण येथे सामूहिक क्षमापना

## प्रत्येकाच्या मनात कायम क्षमा भाव असावा : प्रविणऋषीजी महाराज

नगर – राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांच्या पावन भूमीत आनंदधाम परिसरातील आनंद तीर्थ समवशरण येथे बुधवारी पर्युषण पर्वातील सामूहिक क्षमापना कार्यक्रम पार पडला. जीवनात कळत नकळत चुका होतात. वागण्या बोलण्यातून कोणाचे मन दुखावले दुखावले जाते, अशा सर्व गोष्टींसाठी सर्वांनी हृदयपूर्वक क्षमा याचना केली. ’खमाव खमाव’च्या गजरात सामूहिक क्षमापना कार्यक्रम झाला.

महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा., अर्हम् विज्ञा प्रणेता उपाध्याय प्रवर प्रविणऋषीजी म.सा., आलोकऋषीजी म.सा., तिर्थेशऋषीजी म.सा., सत्यप्रभाजी म.सा., अमितज्योतीजी म.सा. आदी साधू साध्वीजींच्या सान्निध्यात झालेल्या या कार्यक्रमावेळी आ.संग्राम जगताप, बडीसाजन श्री संघाचे अध्यक्ष पेमराज बोथरा, जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, जैन सोशल फेडरेशनचे डॉ.प्रकाश कांकरिया, समर्पण चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी मुंबईचे उद्योगपती व अहिल्यानगरचे पुत्र तथा तिरूपती बालाजी देवस्थानचे विश्वस्त सौरभ हेमराज बोरा, सौ. राखी सौरभ बोरा, प्रमिलाताई हेमराज बोरा, पराग बोरा व बोरा परिवारातील सदस्य, चातुर्मास भोजन कमिटीचे संतोष पिपाडा, समर्पण चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष अशोक (बाबूशेठ) बोरा, महामंत्री आदेश चंगेडिया, कार्याध्यक्ष राजेश भंडारी, कोषाध्यक्ष विलास कटारिया, उपाध्यक्ष अनिल पोखरणा, राजकुमार बोरा, विजय गुगळे, सुरेश कांकरिया, सचिन देसरडा, मनसुख गुंदेचा, सहसचिव अभय गांधी, अभिजीत गांधी आदींसह भाविक उपस्थित होते.

प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज म्हणाले, पर्युषण पर्व मतभेद, कटुता समाप्त करण्याचे पर्व आहे. एक दुसऱ्याची क्षमा मागून भूतकाळातील चुका दुरुस्त करायच्या असतात. हे पर्व जैन समाजाचा गौरव आहे. उपाध्यायश्री जिन शासनाची प्रभावना करून प्रत्येकाला नवीन दृष्टी देत आहेत. यंदाच्या चातुर्मासाचे मुख्य लाभार्थी सौरभ बोरा यांनाही ’समाज रत्न’ म्हणून मी अलंकृत करत आहे.

प्रविणऋषीजी महाराज मार्गदर्शन करताना म्हणाले, जेव्हा दुसऱ्यांकडून खूप अपेक्षा ठेवली जाते तेव्हा कुठे ना कुठे दुखावले जातोच जितक्या अपेक्षा कमी असतात तितके नाते कमजोर असते. अपेक्षा जास्त असतील तर नातेही अधिक घट्ट असते. या घट्ट नात्यातही कधी कधी एकमेकांना दुखावले जाते. त्यांच्याप्रती क्षमा भावच हवा. चातुर्मासात नगरच्या भाविकांनी माझ्यावर प्रेमाचा वर्षाव केला आहे. चातुर्मासाला समर्पण नाव आम्ही दिले पण समर्पण काय असते हे नगरच्या भाविकांनी दाखवून दिले. अनेकांशी माझा थेट संपर्क नसूनही त्यांनी चातुर्मासात स्वतःला झोकून दिले आहे. या सर्वांच्या भावना मला कळतात पण ते कुठलीही तक्रार करत नाहीत. असे निरपेक्ष प्रेम केवळ गुरूदेवांच्या कृपेने गुरूदेवांच्या भूमीतच मिळू शकते, इतरत्र कुठेही हे शक्य नाही. अशावेळी कळते की गुरूदेवांनी आपल्या शिखर साधनेसाठी नगरची भूमी का निवडली.

आमदार संग्राम जगताप म्हणाले, समर्पण चातुर्मासातील पर्युषण पर्वाची सांगता झाली आहे. प्रविणऋषीजी महाराज यांचे मोलाचे मार्गदर्शन सर्वांना लाभत आहे. सर्वांनी जप तप उपवास केले. त्यामुळे नवीन पिढीला अध्यात्माची, धार्मिकतेची गोडी लागते. संपूर्ण कुटुंब धार्मिक होते. या समर्पण चातुर्मासामुळे देशभरात अहिल्यानगरचा नावलौकिक होत आहे. आज क्षमा याचनेचा दिवस आहे. प्रत्येक व्यक्तीकडून जीवनात कळत नकळत चुका होत असतात. पर्युषण पर्व आपल्याला क्षमायाचना करून आपापसातील संबंध पुन्हा चांगले करण्याची संधी देते. ही मानवतेची विचारधारा जैन धर्मात आहे.

अशोक (बाबूशेठ) बोरा म्हणाले, अहिल्यानगरमधील चातुर्मासाचे दोन महिने पूर्ण झाले आहेत. पूज्य गुरु भगवंतांचे अनमोल मार्गदर्शन सर्वांना मिळत आहे. चातुर्मास काळात नगरमधील सर्व संघांचे चांगले सहकार्य लाभत आहे. सौरभ बोरा मित्र परिवार, भोजन कमिटी सदस्य चांगले काम करून सर्व व्यवस्था उत्तम राहील याची काळजी घेत आहे. चातुर्मासासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचेच आभार मानून क्षमायाचना करतो. सर्व ट्रस्ट मंडळ सदस्यही सर्व नियोजनात अतिशय मोलाचे योगदान देत आहेत. या काळात भाविकांची काही गैरसोय झाली असेल तर मी क्षमायाचना करतो.

समर्पण चातुर्मास कमिटीच्या सर्व ट्रस्टी मंडळाने ट्रस्टतर्फे व वैयक्तिक परिवारातर्फे क्षमायाचना केली. प्रवर्तक कुंदनऋषीजी महाराज, प्रविणऋषीजी महाराज यांच्या मंगलपाठाने कार्यक्रमाची सांगता झाली.



## गुरुवाणी – ५२
## क्षमापना !

आपण सर्वात जास्त अपराधी, गुन्हेगार तीर्थंकर परमात्म्याचे असतो. यानंतर आपण अपराधी असतो गुरूदेवांचे, यानंतर स्वतःच्या आई वडीलांचे. आपण अपराधी असतो संघाचे तसेच आपल्या परिवाराचे. या पाच क्षमा प्रार्थना आज करायच्या आहेत. मी तीर्थंकर परमात्म्याची तीर्थ बनण्याची व्यवस्था, नाम कर्म नाकारले यासाठी मी क्षमायाचना करतो. गुरूदेवांची शिकवण, आई वडीलांच्या प्रेमाचा मी स्विकार केला नाही यासाठी मी क्षमापना करतो. तीर्थंकरांची संघ व्यवस्था आहे. या संघासाठी मी योगदान देऊ शकलो नाही, कुटुंबातील सदस्यांना दुखावले यासाठी मी क्षमापना करतो. हा भाव आज प्रत्येकाच्या मनात असला पाहिजे. जेव्हा दुसऱ्यांकडून खूप अपेक्षा ठेवली जाते तेव्हा कुठे ना कुठे दुखावले जातोच आणि जितक्या अपेक्षा कमी असतात तितके नाते कमजोर असते. अपेक्षा जास्त असतील तर नातेही अधिक घट्ट असते. या घट्ट नात्यातही कधी कधी एकमेकांना दुखावले जाते. त्यांच्याप्रतीही क्षमाभाव हवा. २८ मार्च १९९२ ला गुरूदेवांच्या निर्वाणानंतर महाराष्ट्र प्रवर्तक पूज्य कुंदनऋषीजी महाराज यांनीच मला वैयक्तिक सांभाळले. त्यांनी सांभाळले नसते तर मी आज इथे तुमच्या समोर नसतो. एवढं असूनही २००६ नंतर आमच्यात दुरावा, गैरसमज वाढले. याचे माझ्या मनात खूप दुःख होते. या चातुर्मासात आमच्यातील दुरावा संपुष्टात आला. त्यांनी माझ्यावर कृपा केली. हा समर्पण चातुर्मास आहे. मला नगरमध्ये २०२५ चा चातुर्मास करायचा होता. परंतु मला संघर्ष करायचा नव्हता. म्हणून मी २०२५ चा घोषित चातुर्मास केला नाही. परंतु पुढे काही घटना झाल्या. मला गुरूदेव आणि प्रवर्तकश्रींचा संदर्भ देण्यात आला. त्यामुळे आज २०२६ ला मी नगरला चातुर्मास करत आहे. नगरच्या भाविकांनी माझ्यावर प्रेमाचा वर्षाव केला आहे. चातुर्मासाला समर्पण नाव आम्ही दिले पण समर्पण काय असते हे नगरच्या भाविकांनी दाखवून दिले. असे समर्पण की त्यांनी कोणत्याच गोष्टीची तक्रार केली नाही. निरपेक्ष प्रेमामुळेच हे शक्य झाले आहे. अनेकांशी माझा थेट संपर्क नसूनही त्यांनी चातुर्मासात स्वतःला झोकून दिले आहे. या सर्वांच्या भावना मला कळतात पण ते कुठलीही तक्रार करत नाहीत. जे प्रेम करतात ते तक्रारी करत नाहीत. असे निरपेक्ष प्रेम केवळ गुरूदेवांच्या कृपेने गुरूदेवांच्या भूमीतच मिळू शकते, इतरत्र कुठेही हे शक्य नाही. अशावेळी कळते की गुरूदेवांनी आपल्या शिखर साधनेसाठी नगरची भूमी का निवडली. नगरच्या श्रद्धाळूंना दुःखी केले असेल तर मी क्षमायाचना करतो.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

## जैन संवत्सरी निमित्त नगरमधील हर्षिता गांधी हिचा निरंकारी उपवास



नगर – जैन संवत्सरी निमित्त हर्षिता पराग गांधी हिने वयाच्या सहाव्या वर्षी पहिला निरंकारी उपवास केला. तिला गुरुदेवांचे खूप आशिर्वाद प्राप्त झाले. हर्षिता ही सौ. अनिता पराग गांधी (चादरवाला) यांची कन्या आहे.

इतक्या लहान वयात उपवास केल्याबद्दल समाजातून तिचे विशेष कौतुक होत आहे.

# ‘भारत कनेक्ट फॉर बिझनेस प्लॅटफॉर्म’ सुरू करणारी सेंट्रल बँक ऑफ इंडिया सार्वजनिक क्षेत्रातील पहिली बँक

नगर – भारतातील डिजिटल बी२बी (B2B – बिझनेस टू बिझनेस) पेमेंट व्यवस्था अधिक मजबूत आणि सक्षम करण्याच्या दिशेने ’सेंट्रल बँक ऑफ इंडिया’ने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. एनपीसीआय भारत बिलपे लि. (NBBL) च्या सहकार्याने भारत कनेक्ट फॉर बिझनेस हे डिजिटल व्यासपीठ सुरू करणारी सेंट्रल बँक ऑफ इंडिया ही देशातील पहिली सार्वजनिक क्षेत्रातील बँक ठरली आहे. ग्लोबल फिनटेक फेस्ट २०२६ दरम्यान एनपीसीआय पॅव्हेलियन येथे आयोजित सोहळ्यात या उपक्रमाचा अधिकृत शुभारंभ करण्यात आला. या प्रसंगी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी कल्याण कुमार आणि एनबीबीएलच्या व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी नूपुर चतुर्वेदी हे प्रमुख उपस्थित होते. अशी माहिती अहिल्यानगरचे सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे क्षेत्रीय प्रबंधक नरेश कुमारदुबे यांनी दिली. भारत कनेक्ट फॉर बिझनेस हे व्यासपीठ उद्योजकांसाठी एक एकात्मिक डिजिटल प्लॅटफॉर्म म्हणून काम करेल. या प्लॅटफॉर्मद्वारे व्यावसायिक आणि उद्योजक डिजिटल इनव्हॉइस तयार करू शकतील. खरेदीदार आणि विक्रेते यांच्यात त्वरित व सुरक्षित व्यवहार करू शकतील.

पेमेंट मिळवणे आणि देणे सहज शक्य होईल. संकलन आणि सेटलमेंटचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक व जलद रीतीने करू शकतील. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना (MSMEs) डिजिटल व्यवहार करणे अधिक सुलभ होणार आहे. यामुळे उद्योग क्षेत्रातील आर्थिक कार्यक्षमता वाढून डिजिटल पेमेंट परिसंस्थेला बळ मिळेल. विकसित भारत या राष्ट्रीय ध्येयाला गती देण्यासाठी आणि आधुनिक डिजिटल पेमेंट व्यवस्थेला प्रोत्साहन देण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया कटिबद्ध असल्याचे बँकेच्या व्यवस्थापनाने स्पष्ट केले.






# जिल्हास्तरीय संत साहित्य संमेलनाच्या कार्याध्यक्षपदी डॉ.दिलीप धनेश्वर व सचिवपदी संजय खेले यांची नियुक्ती



नगरमध्ये होणाऱ्या संतसाहित्य व परंपरा’ या जिल्हास्तरीय संत साहित्य संमेलनाच्या कार्याध्यक्षपदी डॉ.दिलीप धनेश्वर व सचिवपदी संजय खेले यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

नगर – नगरमध्ये संतसाहित्य व परंपरा’ या विषयावर २४ व २५ ऑक्टोबर रोजी जिल्हास्तरीय’ संत साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. मराठी भाषा विभाग, साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या आर्थिक योगदानातून व नगरच्या आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या विद्यमाने या संत साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे. या संमेलनाच्या कार्याध्यक्षपदी डॉ. दिलीप धनेश्वर व सचिवपदी संजय खेले यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संत साहित्य संमेलनाचे नियोजन करणाऱ्या श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्ग सामूहिक चिंतन प्रकल्पाच्या साधकांच्या झालेल्या बैठकीत या नियुक्त्या करण्यात आल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे धर्माचार्य प्रमुख आबा मुळे यांच्या हस्ते डॉ.धनेश्वर व श्री. खेले यांचा सत्कार करून अभिनंदन करण्यात आले.

यावेळी आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ.अनिल सहस्रबुद्धे व श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्गाचे साधक उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रा.डॉ.अनिल सहस्रबुद्धे यांनी संत साहित्य संमेलांच्या नियोजनाची माहिती दिली.

डॉ.दिलीप धनेश्वर यांनी आभार मानून संमेलनाच्या विविध समित्यांच्या नियुक्त्या लवकरच करण्यात येणार असल्याचे सांगितले.

## सौ.प्रतिक्षा रोहम–बारसे पीएच.डी. पदवीने सन्मानित



नगर – येथील सौ. प्रतिक्षा रोहम–बारसे यांनी नुकतीच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जैवतंत्रज्ञान विभागातून जैवतंत्रज्ञान विषयात पीएच. डी. पदवी संपादन केली. सौ. प्रतिक्षा यांनी "Type 2 Diabetes Mellitus' (मधुमेह) मध्ये मानवी आयलेट अमायलॉइड पॉलीपेप्टाइड (hIAPP) ची भूमिका, स्वादुपिंडातील बीटा–पेशींचे कार्य व स्टेम सेल आधारित पुनरुत्पादक उपचारपद्धती’ या विषयावर संशोधन केले.

मधुमेहामुळे वाढत्या आरोग्यविषयक समस्येच्या अनुषंगाने स्वादुपिंडातील बीटा–पेशींचे कार्य, hIAPP ची भूमिका तसेच स्टेमसेल आधारित पुनरुत्पादक उपचारपद्धती यांचा अभ्यास त्यांनी केला. त्यांच्या या संशोधनामुळे मधुमेहावरील भविष्यातील उपचारपद्धतींच्या दृष्टीने अभ्यासाला महत्त्वपूर्ण दिशा मिळण्यास हातभार लागणार आहे. स्नेहालयाच्या विविध प्रकल्पात कार्यरत गॅब्रियल (नाना) बारसे यांच्या त्या जेष्ठ स्नूषा आहेत.

सौ. प्रतिक्षा रोहम–बारसे यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक, मित्रपरिवार, सहकारी तसेच हितचिंतकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील संशोधन क्षेत्रातील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.


## सार्वजनिक सूचना

अहिल्यानगर छावनी परिषद के सभी निवासियों को सूचना दी जाती है की, अहिल्यानगर छावनी परिषद के मतदाताओं की वर्ष २०२६ की मतदाता सूची अंतिम रुप से तैयार की गयी है और यह मतदाता सुची कार्यालय के नोटीस बोर्ड पर लगाई गयी है। तथा कार्यालय की वैबसाईट www.ahmednagar.cantt.gov.in पर उपलब्ध करायी गयी है। सभी निवासी इसे ध्यान मे ले।

**प्रिया पुरोहित**
मुख्य अधिशासी अधिकारी,
अहिल्यानगर छावनी परिषद

सं. एनआर/इलेक्ट्रोल रोल/२०२६–२७
तारीख– १५/०९/२०२६

## PUBLIC NOTICE

All the residents of Ahilyanagar Cantonment Board are hereby informed that the Electoral Roll of the electoral of Ahilyanagar Cantonment Board for the year 2026 has been finalized and posted on office notice board and also made available on the official website www.Ahmednagar.cantt.gov.in All residents may note this

No. ANR/Electoral Roll /2026-27
Date -15/09/2026

PRIYA PUROHIT
CHIEF EXECUTIVE OFFICER
AHILYANAGAR CANTONMENT BOARD

